# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## वाल्मिक कराडवर कारवाई होणारच, प्रसंगी मकोकाही लावणार; मुख्यमंत्र्यांची कठोर भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली असून याप्रकरणी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन सादर केलं. हत्या प्रकरणातील आरोपी कोणाशीही संबंधित असतील तरी त्यांच्यावर कारवाई होणारच, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे. तसंच ज्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे तो राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याच्यावर खंडणीप्रकरणी कारवाई होईल आणि हत्येत सहभाग असेल तर त्याप्रकरणीही कारवाई होईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वाल्मिक कराड याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर मस्साजोग इथं सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या दोन्ही गुन्ह्यांचा काय संबंध आहे, याची आपण चौकशी करत आहोत. मी या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की, या गुन्ह्याचा मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. आपण वारंवार वाल्मिक कराडचं नाव घेतलं म्हणून सांगतो, तो कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे, कोणा-कोणासोबत




फोटो आहे याचा विचार न करता कारवाई केली जाईल, असं फडणवीस यांनी सांगितलं.

**बीडच्या पोलीस अधीक्षकांची तडकाफडकी बदली**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या घटनेचे पडसाद विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात पहिल्या दिवसांपासून उमटत आहेत. या प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाने कारवाई करण्यात कुचराई केल्याचे विधानसभेत सांगितले. त्याचबरोबर बीडच्या पोलीस अधीक्षकांची बदल करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा केली. संतोष देशमुख हत्या प्रकरणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या तारांनी संतोष देशमुख यांना बांधले होते, त्याचे फोटोही सभागृहात दाखवले. या प्रकरणावर बोलताना देवेंद्र फडणवीसांनी ज्यांचा या प्रकरणात समावेश असेल, मग भूमाफिया असेल, तरी त्यांच्यावर मकोका लावू, असा इशारा फडणवीसांनी दिला.

**पाळंमुळं खणून काढणार, आरोपींवर मकोकाही लावणार**

ज्या प्रकारे बीड जिल्ह्यात अराजकताचं राज्य तयार करण्याचा प्रयत्न होतोय, कोणावरही खोटे गुन्हे दाखल करायचे चुकीचे प्रकार घडत आहेत. मी तेथील डीजींनाही सांगितलं की, यात पोलीस प्रशासनाचाही दोष आहे. मध्यंतरीच्या काळात निर्ढावलेल्या लोकांनी चुकीचं काम केलं आहे. हे सहन केलं जाणार नाही. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांची पाळंमुळं खोदून काढू. यांच्यावर ३०२ कलमान्वये तर कारवाई होईलच, पण त्यासोबतच यांच्यावर एकत्रित अनेक गुन्हे आहेत. त्यामुळे हे सगळे मकोकाच्या गुन्ह्याला पात्र होतात. त्यांच्यावर मकको लावून तडीपार केलं जाईल. जे लोक या गुन्ह्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामील आहेत त्यांनाही संघटित गुन्हेगारीचा भाग समजून मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

## कल्याण मारहाण प्रकरणी अखेर अखिलेश शुक्लांनी दिलं स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० मुंबई**

गुरुवारी संध्याकाळी कल्याणच्या योगीधाम परिसरात एका सोसायटीमध्ये मराठी व्यक्तीला अमराठी व्यक्तीने मारहाण केल्याचा दावा करत या प्रकरणावर बरीच चर्चा होत असल्याचं दिसत आहे. अजमेरा सोसायटीमधील हा प्रकार असून या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. हे प्रकरण थेट विधानसभेतही पोहोचलं असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील या प्रकरणावर विधानसभेत भूमिका मांडल्यानंतर आता ज्या व्यक्तीवर मारहाणीचा आरोप आहे, त्या अखिलश शुक्ला यांचं स्पष्टीकरण समोर आलं आहे.



अखिलेश शुक्लांनी एक व्हिडीओ जारी करून त्या माध्यमातून त्यांची भूमिका मांडली आहे. या व्हिडीओमध्ये अखिलेश शुक्ला यांनी देशमुख कुटुंबावरच मारहाण व शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. आधी देशमुखांनी आपल्या पत्नीला शिवीगाळ करून तिचे केस ओढले. नंतर झालेला प्रकार हा पत्नीला वाचवण्यासाठी घडला, अशी बाजू अखिलेश शुक्ला यांनी मांडल्यामुळे या प्रकरणाला नवं वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## आता संसदेच्या गेटवर कसल्याही प्रकरचे धरणे किंवा आंदोलनाला बंदी

### काँग्रेस-भाजपा खासदारांच्या धक्काबुक्कीनंतर लोकसभा अध्यक्षांचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

संसदेच्या परिसरात गुरूवारी (१९ डिसेंबर) झालेल्या धक्का बुक्कीच्या पार्श्वभूमीवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मोठा निर्णय घेतला आहे.आता कोणत्याही राजकीय पक्ष किंवा खासदारांच्या गटला संसद भवनाच्या गेटवर कसल्याही प्रकरचे धरणे किंवा आंदोलन करता येणार नाही. संसदेचे कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या उद्देशाने हे कठोर निर्देश देण्यात आले आहेत.

या निर्देशांनंतर संसद भवनाच्या कोणत्याही गेटवर आंदोलन करता येणार नाही. लोकसभा अध्यक्ष कार्यालयाने हे निर्देश जारी करताना संसदेचे पावित्र्य राखण्यासाठी तसेच कामकाज सुरळीत चालण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

संसद भवनाच्या परिसरात इंडिया आघाडीच्या खासदारांकडून डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांनी केलेल्या विधानावरून आंदोलन केले जात असताना, गुरूवारी विरोध पक्षांचे खासदार आणि एनडीएचे खासदार आपापसात भिडल्याचे पाहायला मिळाले होते. भाजपाने आरोप केला की त्यांचे दोन खासदार प्रताप चंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत यांना विरोधी पक्षांच्या खासदारांनी ढकलून दिल्याने ते जखमी झाले आहेत. भाजपा खासदार प्रताप चंद्र सारंगी यांनी दावा केला की राहुल गांधी यांनी एका खासदराला ढकलले ज्यामुळे ते खाली पडले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दोन्ही खासदारांना फोन करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. दोन्ही खासदारांना आरएमएल रुग्णालयात नेण्यात आले होते. तर राजपूत यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.संसदेबाहेर झालेल्या धक्काबुक्की प्रकरणात राहुल गांधी आणि इतरांविरोधात दिल्ली पोलीसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांच्या अंतर्गत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, ज्यामध्ये ११५, ११७, १२५, १३१, ३५१ आणि ३(५) या कलमांचा समावेश आहे.

## शिवसेना पक्षाचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे उदार झाले

### उद्धव ठाकरेंना ही महत्वाची गोष्ट परत करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह दोन्ही गोष्टी एकनाथ शिंदेंकडेच ठेवल्या होत्या. तसेच पक्षाच्या चल-अचल संपत्तीवरही दोन्ही गटात दावे सुरु होते. यापैकी शिवसेना ताब्यात घेण्यापूर्वी पक्षाच्या खात्यावर जमा असलेली सर्व रक्कम उद्धव ठाकरेंना परत करण्याचा निर्णय शिंदेंनी घेतला आहे.



लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीचा निकाल आला आहे. खरी शिवसेना कोणाची याचा जवळपास निर्णयही जनतेने दिला आहे. आता मुंबई महापालिका निवडणूक येत आहे. या निवडणुकीत मुंबईत कोणाच्या शिवसेनेचे वर्चस्व राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना शिंदेंनी उदार मन दाखविले आहे.

शिवसेना पक्ष ताब्यात आल्याने या पक्षाला मिळालेल्या देणग्या, पक्षाची कार्यालये आदी गोष्टी शिंदेंकडे गेल्या होत्या. यामुळे उद्धव ठाकरे गट आणि शिंदे गट यावरून वाद घालत होते. उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडे पैसा नसल्याने निवडणूक लढविण्यासाठी आर्थिक अडचणी येत होत्या. या सगळ्यावर आता शिंदेंनी तोडगा काढला आहे. २०२२ पूर्वी शिवसेनेच्या खात्यात जमा असलेल्या रकमेवर शिंदे गट दावा सांगणार नाही असा निर्णय शिंदेंनी घेतल्याचे वृत्त आहे. आजतकने याची माहिती दिली आहे. २०२२ पूर्वी शिवसेनेच्या खात्यावर जेवढी रक्कम होती ती उद्धव ठाकरेंच्या पक्षाला दिली जाणार आहे. सूत्रांनुसार शिंदे गटाने याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला दिली आहे. उद्धव ठाकरेंपासून शिवसेना काढून घेतल्यानंतर शिंदेंनी आपण ठाकरेंच्या मागणीनुसार पक्षाची काही रक्कम दिल्याचे काहीवेळा जाहीररित्या सांगितले होते. आता उर्वरित रक्कमही ठाकरेंना देण्याचा निर्णय घेतला आहे.

## आर आर आबांच्या लेकाने अजितदादांची घेतलं भेट

### राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

नागपुरात महायुती सरकारचं पहिलं अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान मोठ्या घडामोडी सुरू आहेत. दोन दिवसापूर्वी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार शशीकांत शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. आता दुसऱ्याच दिवशी तासगाव कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील अजित पवार यांच्या निवासस्थानाजवळ भेटीसाठी पोहोचले आहेत. यामुळे आता राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत.

गेल्या काही दिवसापासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. काही दिवसापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार पटेल, खासदार सुनिल तटकरे यांनी खासदार शरद पवार यांची दिल्लीत भेट घेतली होती. यावेळी खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या, ही भेट शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त होती अशी बोलली जात आहे. तर दुसरीकडे ही भेट राजकीय असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान, दोन दिवसापूर्वी आमदार



अमोल मिटकरी यांनी आमदार जयंत पाटील सत्तेत येणार असल्याचा गौप्यस्फोट केला होता. दरम्यान, आता दोन्ही राष्ट्रवादीतील नेत्यांच्या वाढलेल्या भेटीगाठी यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा आणखी वाढल्या आहेत.

**मतदारसंघातील कामांसाठी भेटायला आलो**

दरम्यान, आज आमदार रोहित पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीसाठी गेले आहेत. या भेटीआधी त्यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी ही भेट मतदारसंघातील विकास कामासंदर्भात असल्याचे सांगितले होते. रोहित पाटील म्हणाले, मी पत्र देण्यासाठी आलो आहे. काल मी विधिमंडळात मतदारसंघातील कामाबाबत पत्र देण्याचा प्रयत्न केला. दादा बोलले इथं योग्य दिसत नाही, तुम्ही मला उद्या सकाळी बंगल्यावर भेटा, मी बंगल्यावरती पत्र देण्यासाठी आलो आहे, असंही रोहित पाटील म्हणाले. मी तर माझ्या मतदारसंघातील कामासाठी पत्र द्यायला आलो आहे. माझ्या मतदारसंघात ऊर्जा विभागाकडून मला नवीन डीपी हवे आहेत. या मागणीसाठी मी दादांची भेट घ्यायला आलो आहे, असंही आमदार रोहित पाटील म्हणाले.

## शहांच्या समर्थनार्थ आता भाजप मैदानात, काँग्रेसचे विरोधात आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० नागपूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी गुरुवारी केलेल्या निदर्शनांनंतर, शिवसेनेच्या शिंदे गटाकडून शहा यांच्या समर्थानात आंदोलन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी भाजपच्या आमदारांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत ठिय्या दिला.

आंबेडकरांचा विरोध हा काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे आणि संविधानविरोधी काँग्रेस हाय हाय अशा घोषणांसह



फलक हातात घेत काँग्रेसवर डॉ. आंबेडकर यांचे योगदान दुर्लक्षित केल्याचा आणि त्यांच्या नावाचा राजकीय स्वार्थासाठी वापर केल्याचा आरोप भाजप आमदारांनी केला. आंदोलनावेळी अमित शहा यांचे समर्थन करत काँग्रेसवर त्यांची विधाने मुद्दाम चुकीच्या पद्धतीने मांडल्याचा आरोप केला. शहा यांच्या वक्तव्यांचा विपर्यास करून काँग्रेसने अनावश्यक वाद निर्माण केला आहे. अशा प्रकारचे राजकारण ही त्यांची खासियत आहे, असे आंदोलक म्हणाले. तसेच, महायुती सरकार डॉ. आंबेडकर यांच्या वारशाचा सन्मान राखण्यासाठी वचनबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजप नेत्यांनी काँग्रेसवर ढोंग केल्याचा आरोप केला आणि १९७५ च्या आणीबाणीच्या घटनेचा उल्लेख करून काँग्रेसने लोकशाही मूल्यांकडे केलेल्या दुर्लक्षावर टीका केली. लोकशाही किंवा आंबेडकरांच्या वारशावर भाष्य करण्याचा काँग्रेसला कोणताही नैतिक अधिकार नाही, असेही आंदोलक म्हणाले.राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस चुकीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला. त्यांचे आंदोलन म्हणजे त्यांच्या अपयशांपासून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठीचा एक खटाटोप आहे. त्यांच्या असभ्य निदर्शनांमुळे आमचे खासदारही जखमी झाले आहेत, असे त्यांनी सांगितले. आंदोलनात भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये पंकजा मुंडे, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मटे, आशिष देशमुख आदींचा समावेश होता.

## मग महाराष्ट्र सैनिकांनी थैमान घातलं तर', कल्याणच्या घटनेवर राज ठाकरे यांनी दिला मोठा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २० मुंबई**

कल्याण पश्चिमेतील एका हायप्रोफाईल सोसायटीत एका मराठी भाषिक कुटुंबाला मराठी असणाऱ्यावरुन हिणवत जबर मारहाण झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याल घटनेवर प्रचंड वातावरण तापल्यानंतर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. राज ठाकरे यांनी आपल्या अधिकृत फेसबुक अकाउंटवर या घटनेवर भूमिका मांडली आहे. सस्नेह जय महाराष्ट्र, कल्याणमध्ये एका मुजोर अमराठी माणसाने मराठी माणसाला, मराठीपणावरून अर्वाच्य शिव्या देत, जबर मारहाण केली. अशीच मुजोरी काही दिवसांपूर्वी गिरगावमध्ये एका अमराठी माणसाने



दाखवली. तिकडे त्याला महाराष्ट्र सैनिकांनी जागच्या जागी प्रसाद दिला. कालच्या प्रकरणानंतर पण माझे महाराष्ट्र सैनिक कल्याणमध्ये प्रसाद द्यायला गेले होते. कल्याणच्या घटनेत कोणीतरी शुक्ला नावाचा माणूस होता, महाराष्ट्रात असे अनेक महाराष्ट्रद्वेषी शुक्ला, गुप्तपणे राहत आहेत. मध्यंतरी गिरगावमध्ये घडलेली घटना असो की ही कल्याणमधली, प्रत्येकवेळेला हे असले महाराष्ट्रद्वेषी मराठी माणसाचा कणा तपासून बघत असतात आणि अजून किती तुम्हाला वाकवता येईल हे बघत असतात, असं राज ठाकरे म्हणाले आहेत. बरं असं पण नाही की महाराष्ट्रा बाहेरून इथे आलेले सगळेच महाराष्ट्रद्वेषी आहेत.

संपादकीय ......

# अवसान गळालेले लोकप्रतिनिधी

सध्या विधानसभा आणि लोकसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. दोन्ही सभागृहांमध्ये महत्त्वाची विधेयके आणि विविध विषयांवर चर्चा होत आहे. अशा वेळी आपले आमदार, खासदार सभागृहात असावेत, त्यांनी चर्चा करावी अशी अपेक्षा जनतेची, मतदारांची असल्यास ते योग्यच आहे. प्रत्यक्षातील चित्र मात्र वेगळे असते. लोकसभा आणि विधानसभेतील सध्याचे चित्र पाहिले तर जनता फक्त मत देण्यापुरती असते आणि त्यानंतर जनतेचा आणि लोकप्रतिनिधींचा काही संबंध आणि संपर्क असतो का, हा संशोधनाचा विषय होऊ शकतो.

कारण मंत्रिपद न मिळाल्याने महायुतीमधील अनेक आमदार नाराज आहेत. ही नाराजी त्यांच्या बोलीतून दिसत आहे आणि देहबोलीतून उघड होत आहे. यातील काही आमदारांनी विधानसभेत न येता पुन्हा मतदारसंघात जाणे पसंत केले आहे. तर काही आमदार त्यांच्या सोयीप्रमाणे अधिवेशनात सहभागी होताना दिसत आहेत. आता हाच मुद्दा उपस्थित होत आहे की आमदार, खासदारकीचे तिकीट मिळवण्यासाठी धडपड करणारे निवडणुकीत विजयी झाल्यानंतर तेवढ्याच आत्मीयतेने विधानसभा, विधानपरिषदेत तसेच संसदेत उपस्थित का राहात नाहीत.लोकप्रतिनिधी काही कारणास्तव सभागृहात उपस्थित राहू शकत नसतील तर तसे पत्र त्यांना द्यावे लागते. तरीही मूळ मुद्दा हाच आहे की आमदार, खासदार होणे हा त्यांनी निवडलेला पर्याय आहे, या सभागृहात जनतेचे प्रश्न मांडायचे असतात. अशा वेळी आले मनात अन् मारली दांडी, असे होता कामा नये.

सध्या मंत्रिपद न मिळाल्याने नाराज असलेले अनेक आमदार सभागृहात गैरहजर आहेत. त्यांची सभागृहातील अनुपस्थिती ही मतदारांशी प्रतारणा नाही का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जनतेची सेवा करायची आहे, लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडायची आहे असे आवाहन निवडणुकीपूर्वी करणारे प्रत्यक्षात त्यांच्या सोयीनेच किंवा व्हिप काढल्यानंतर सभागृहात जाताना दिसत आहेत. हे लोकशाहीला नक्कीच साजेसे नाही.आमदार, खासदार हे लाखो लोकांचं प्रतिनिधीत्व करतात. लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी संसदीय आयुधे आहेत. त्यांचा वापर कसा करायचा, याचीही माहिती दिली जाते. मात्र, बहुतेक आमदार किंवा खासदार मौनी असतात. ते अनेकदा सभागृहात येत नाही, आले तर काहीच बोलत नाहीत. आपण ज्या कायदेमंडळाचे सदस्य आहोत, तेथील चर्चेत भाग घेणे ही त्यांची जबाबदारी असते. मात्र, याकडे कुणी फारसे गांभीर्याने पाहात नाही. केवळ मतदारसंघात रस्ते बांधले, गटार बांधले, समाज सभागृह बांधले यावरच जनता भुलते.

धोरणात्मक निर्णयात आपले लोकप्रतिनिधी सहभागी होतात का, त्यांच्या विचारांची प्रगल्भता किती आहे, दीर्घकालीन योजनेत त्यांचे योगदान किती याचा कुणीही विचार करत नाही. आता अधिवेशन काळात आमदार, खासदारांची सभागृहात १०० टक्के उपस्थिती असायला हवी, त्यांनी चर्चेत सहभागी व्हायला हवे. तरीही अनेक आमदार त्यांच्या मतदारसंघातच राहतात किंवा सभागृहात गैरहजर असतात. वास्तविक अधिवेशन अचानक भरवले जात नाही. त्याची तारीख काही महिने अगोदर जाहीर होते.असे असताना ज्या सभागृहाचे आपण सदस्य आहोत तेथे आपले आमदार, खासदार नियमित आणि पूर्णवेळ का उपस्थित राहात नाहीत, हा प्रश्न मतदारांनी विचारायला हवा. स्वत:ला लोकसेवक म्हणवणारे आमदार, खासदार निवडून आल्यानंतर खरंच लोकांची सेवा करतात का, आमदार, खासदार झाल्यानंतर ते लोकांच्या किती संपर्कात असतात, हा चर्चेचा विषय आहे. आपले कार्यकर्ते आणि पदाधिकारी म्हणजेच संपूर्ण मतदार असा अनेकांचा भ्रम असतो. हा गैरसमजही दूर होणे आवश्यक आहे.आताही अधिवेशनाच्या निमित्ताने मंत्रिपद न मिळाल्याने अनेक आमदारांनी अधिवेशनाकडे पाठ फिरवली. हे आमदार सत्ताधारी पक्षाचे आहेत. तर काही विरोधी पक्षातील आमदारही दोन दिवसांनी आरामात अधिवेशनात सहभागी झाले आहेत. अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपयांचा खर्च करते. आमदारांना मासिक मानधन दिले जाते. हा सर्व खर्च करदात्यांच्या खिशातून केला जातो. अशा वेळी सभागृहात हजर न राहता बाहेर पत्रकार परिषद घेऊन सरकारवर किंवा विरोधकांवर टीका करण्यात काय अर्थ आहे.

प्रश्न मांडण्यासाठी, चर्चा करण्यासाठी लोकशाहीत कायद्याने सभागृह उपलब्ध आहे. मात्र, सभागृहात न जाता बाहेर माध्यमांशी इतर प्रश्नांवर चर्चा करणे, टीका करण्यासाठी यांना वेळ मिळतो. हा जनतेच्या पैशांचा अपव्यय आहे. खरंतर सरकारनेच अधिवेशन संपल्यानंतर प्रत्येक आमदाराची हजेरी जाहीर करायला हवी. त्यामुळे आपण निवडलेले आमदार विधिमंडळात किती वेळा जातात आणि कामकाजात किती सहभागी होतात हे जनतेलाही कळेल. आपल्याला मंत्रिपद मिळाले नाही म्हणजे जणू आपला हक्क काढून घेतला अशा अविर्भावात हे आमदार वागतात.


त्यांना हे कळायला हवे की ते आपण लाखो मतदारांचे प्रतिनिधीत्व करत आहोत. अशा वेळी सभागृहात न जाणे हा मतदारांच्या मतांचा अपमान होत असतो. याचा त्यांनी विचार करायला हवा. लोकांनी आपल्याला त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिलेले आहे, हे त्यांनी लक्षात ठेवायला हवे. सभागृहातील उपस्थिती म्हणजे वेळ फुकट घालवणे, त्यापेक्षा आम्ही आमच्या मतदारसंघात जाऊन लोकांची कामे करू, असे आमदारांचे म्हणणे असते. पण लोकप्रतिनिधींची सभागृहांमधील अनुपस्थिती ही लोकशाही शासन प्रणालीसाठी पोषक नाही, हे त्यांनी लक्षात ठेवायला हवे.

# पी. आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी योग सत्र संपन्न

## विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती** –पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट अमरावतीच्या संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्य आणि एकाग्रता वाढवण्यासाठी नुकताच एक विशेष योग सत्र यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले यात गुगल मीट व युट्युब वर ऑनलाइन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



या सत्राला मुख्य अतिथी म्हणून चेन्नईच्या सुप्रसिद्ध योगा आणि झुंबा प्रशिक्षक श्रीमती रिता भट्टड उपस्थित होत्या. श्रीमती भट्टड यांनी विद्यार्थ्यांना ताणतणाव, भावनांचे व्यवस्थापन आणि आरोग्यदायी जीवनशैली कशी टिकवावी यावर मार्गदर्शन केले. त्यांनी सूर्यनमस्कार , तड़ासन , पश्चिम उत्तम आसन, (विशेषत: मुलींसाठी) यांसारख्या योगासने शिकवली आणि एकाग्रतेसाठीचे महत्त्व अधोरेखित केले. सत्रा दरम्यान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष योगासने करून सहभागी होण्याचा अनुभव घेतला. त्यानंतर ,त्यांनी ध्याना ध्यान धारणेचे महत्त्व व जीवनातील एकाग्रतेची भूमिका स्पष्ट केली.

कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन कु. फिजा पठाण हिने केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप जावंधीया यांनी समारोप भाषणात योगाचा विद्यार्थ्यांच्या एकाग्रता व अभ्यासावर होणाऱ्या सकारात्मक परिणामावर भर दिला .त्यांनी विद्यार्थ्यांच्या आणि आयोजन समितीच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

डॉ.गौरी देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सत्राची यशस्वी आखणी करण्यात आली आयोजन समितीचे सदस्य प्रणव शंकरपाळे ,निधी धामैचा ,आचल गोविंदानि, अनन्या क्षीरसागर, ईश्वरी नासारे, हर्ष शर्मा ,आदित्य मने ,कशिष दोधानी , मेघेश वीघे व प्रतिम ठाकरे यांनी कार्यक्रमाची जबाबदारी सांभाळली . .कार्यक्रमाचा समारोप कु. सिद्धी का बोरेकर यांनी आभार प्रदर्शनाने केला ज्यामध्ये मुख्य अतिथी सहभागी आणि आयोजन समितीचे आभार मानले गेले.

हे सत्र विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. महाविद्यालयाने भविष्यातही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे उपक्रम आयोजित करण्याचा निर्धार केला आहे.




# वर्षभर खोबरं फ्रेश राहण्यासाठी टिप्स

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

मांसाहारी पदार्थ असो वा शाकाहारी पदार्थ खोबऱ्याचा वापर केला जातो. त्यात तुम्ही जर कोकणी असाल तर तुमच्या जेवणात दररोज खोबरं हे असेलच. कोकणी कुटूंबाचे जेवण खोबऱ्याशिवाय अपूर्णच असते. त्यामुळे बऱ्याच गृहीणी घरात सुकं खोबरं साठवून ठेवतात. पण, अनेकदा सुकं खोबरं काळ पडते आणि चवीला खवट लागते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला वर्षभर खोबरं कसं फ्रेश ठेवायचे याबद्दल सांगणार आहोत. या टिप्समुळे खोबरं खराब होणार नाही आणि त्यातील पोषक घटक कमी होणार नाहीत.



**उत्तम दर्जाचा नारळ निवडावा –**

वर्षभर खोबंर टिकवण्यासाठी योग्य नारळाची निवड अवश्य आहे, कारण खराब नारळ जर तुम्ही घेतलात आणि त्याचे खोबरं टिकवायच्या विचारात असाल तर खराब होऊ शकते. टिकाऊ नारळ बघताना त्याच्या शेंड्या चेक कराव्यात.

**कोरडी जागा –**

जास्त वेळ खोबरं टिकवायचं असेल तर ओले होणार नाही याची काळजी घ्यावी. खोबरं किसल्यानंतर पूर्णपणे कोरडे करून घ्यावे, थोडा जरी ओलावा खोबऱ्याला जाणवल्यास खराब होऊ शकतो. आता तुम्हाला ओला नारळ सुकवायचा असेल तर उन्हात तुम्ही वाळवू शकता.

**हवाबंद कटेंनर –**

सुकं खोबरं जास्त काळ फ्रेश ठेवण्यासाठी हवाबंद कंटेनरचा वापर करणे फायदेशीर ठरते. हवाबंद कंटेनरमध्ये खोबऱ्याचे आर्द्रता, हवेपासून संरक्षण होते. यासाठी कंटेनर पूर्णपणे स्वच्छ आणि कोरडा करून घ्यावा, जेणेकरून ओलावा, बॅक्टेरिया आत शिरणार नाहीत.

**किसून ठेवा –**

सर्व साधारणपणे खोबऱ्याचे तुकडे करून ठेवले जातात, पण त्याऐवजी तुम्ही नारळ किसून ठेवू शकता. किसलेले खोबरेही वर्षभर सहजपणे टिकते.

**पिशवीत ठेवू शकता –**

खोबरे एका पिशवीत बांधून हवाबंद डब्यात ठेवले तर ते फ्रेश राहते. फक्त त्याला पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी. डब्यात खोबरं ठेवण्यापूर्वी कागदावर पसरवून घ्यावे. एका वाटीत मीठाचे पाणी घ्या. यानंतर एक कापड घेऊन मीठाच्या बूडवावे आणि खोबऱ्याची वाटी पुसून घ्यावी. यानंतर खोबरे सुकवावे आणि मग साठवावे.

# अन्नद्रव्यांची कमतरता, पिकावरील लक्षणे आणि उपाय, जाणून घ्या सविस्तर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक ५**

पिकांवर अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास, पिकाची वाढ योग्य पद्धतीने होत नाही आणि त्यावर वेगवेगळे रोग येतात. अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे कोणती दिसून येतात? त्यावर काय उपाययोजना करावी, याबाबत सविस्तर जाणून घेऊयात...

अन्नद्रव्यांची कमतरता, पिकावरील लक्षणे आणि उपाय

१) नत्र : नत्राच्या कमतरतेमुळे झाडाची खालची पाने पिवळी होतात, मुळांची/झाडाची वाढ थांबते, फूट व फळे कमी येतात.

उपाय : १% (१० लि. पाण्यात १०० ग्रॅम) युरियाची फवारणी करावी.

२) स्फुरद : स्फुरदच्या कमतरतेमुळे पाने हिरवट लांबट होऊन त्यांची वाढ खुंटते, पानाची मागील बाजू जांभळट होते.

उपाय : १ ते २% डीएपीची फवारणी करावी.

३) पालाश : पालाशच्या कमतरतेमुळे पानांच्या कडा तांबटसर होऊन पानावर तांबडे व पिवळे ठिपके पडतात, खोड आखूड होऊन शेंडे गळून पडतात.

उपाय : १% सल्फेट ऑफ पोटॅशची फवारणी करावी.




४) लोह : लोहाच्या कमतरतेमुळे पिकाच्या शेंडाकडील पानांच्या शिरांमधील भाग पिवळा होतो, तसेच झाडाची वाढ खुंटते.

उपाय : ०.२% चिलेटेड लोहाची फवारणी करावी. तसेच २५ किलो फेरस सल्फेट प्रती हेक्टरी जमिनीतून द्यावे.

५) बोरॉन : बोरॉनच्या कमतरतेमुळे पिकाचा शेंडा/कोवळी पाने पांढरट होऊन मरतात, सुरकुत्या पडून पिवळे चट्टे पडतात. फळांवर तांबडे ठिपके पडून भेगा पडतात.

उपाय : ०.५% बोरीक सिडची फवारणी करावी.

६) जस्त : जस्ताच्या कमतरतेमुळे पाने लहान होऊन शिरांमधील भाग पिवळा पडतो आणि पाने वाळलेली दिसून येतात.

उपाय : ०.२% चिलेटेड झिंकची फवारणी करावी. तसेच १० ते २० किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टर जमिनीतून द्यावे.

७) मंगल : मंगलच्या कमतरतेमुळे पानांच्या शिरा हिरव्या परंतु शिरामधील भाग क्रमाक्रमाने पिवळा, पांढरट व करडा होतो. शेवटी पान फिकट होऊन गळते.

उपाय : ०.२% चिलेटेड मंगलची फवारणी करावी. तसेच मँगनीज सल्फेट हेक्टरी १० ते २५ किलो जमिनीतून द्यावे.

८) मॉलिब्डेनम : मॉलिब्डेनमच्या कमतरतेमुळे पाने पिवळी होऊन त्यावर तपकिरी ठिपके पडतात.

उपाय : हेक्टरी २५० ते ५०० ग्रॅम सोडियम मॉलिब्डेट जमिनीतून द्यावे.

९) तांबे : तांब्याच्या कमतरतेमुळे शेंड्यांची वाढ खुंटते, डायबॅक रोग होतो, पाने गळतात.

उपाय : ०.४% मोरचूद फवारावे.

१०) गंधक : गंधकाच्या कमतरतेमुळे पानांचा हिरवा रंग कमी कमी होत पाने पिवळी/पांढरी होतात.

उपाय : हेक्टरी २० ते ४० किलो गंधक शेणखताबरोबर दयावे.

– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्रज्ञ

# महिला काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय समित्या बरखास्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मुंबई** – अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय सर्व समित्या तत्काळ प्रभावाने विसर्जित करण्यात आल्या आहेत. संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील महिला काँग्रेसच्या सदस्यत्व मोहिमेला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.



महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षापदी संध्या सव्वालाखे या कायम राहून नवीन समित्या स्थापन करण्याच्या प्रक्रियेचे नेतृत्व करणार आहेत. राज्यातील महिला काँग्रेसची सदस्य मोहीम पुढे नेण्यासाठी आणि नारी न्याय सभासदत्व सत्कार समारंभ आयोजित करणे आणि महाराष्ट्रातील महिला काँग्रेस संघटनेच्या उभारणीसाठी संध्या सव्वालाखे यांच्या सोबत खालील विधानसभा क्षेत्रातील महिला पदाधिकारी सहकार्य करणार आहेत.

१) दिपाली लालाजी मिसाल – संभाजीनगर २) आयशा अस्लम खान – ठाणे ३) डॉ. अंजली ठाकरे –अमरावती ४) सुनीता गावंडे– रामटेक ५) सीमा विनोद सहारे– गढचिरोली चिमूर ६) स्वाती राजेश जाधव – नाशिक ७) साक्षी एस. वंजारी – रत्नागिरी–सिंधुदुर्ग ८) सीमा महेश आहूजा – कल्याण ९) सुषमा शरदचंद्र राजेघोरपडे – सातारा.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

## ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**– महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पद्धतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. वीज बिलाची किमान रक्कम रु. १००/– असणे आवश्यक आहे. लकी ड्रॉ घोषित करण्यापूर्वीच्या महिन्याच्या अंतिम दिवशी ग्राहकाची थकबाकीची रक्कम रु.१०/– पेक्षा कमी असावी. एक ग्राहक क्रमांक केवळ एका बक्षिसासाठी पात्र असेल.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा –prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ — शहर/ग्रामिण


# आंधियो में भी जो जलता हुआ मिल जाएगा, उस दियेसे पुछना मेरा पता मिल जाएगा

## फडणवीसांचा विरोधकांना शेरो शायरीतून दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नागपूर :-** राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून उत्तर देण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुरुवातीला राज्यातील १४ कोटी जनतेचे आभार मानले. नवीन सरकार आल्यानंतर विधानसभेतील हे माझे पहिले भाषण आहे, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विधानसभेच्या सर्व सदस्यांचे आणि १४ कोटी जनतेचे आभार मानतो. २३७ आमदार या सत्ता पक्षाच्या बाजूने निवडून आले आणि ही आमची महायुती आहे, असे यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून सांगण्यात आले.

तसेच, मागील पाच वर्ष ही संक्रमणाची वर्ष होती. ज्या प्रकारचे आरोप प्रत्यारोप करण्यात आले. ते राजकीय संस्कृतीत कोणीही अनुभवले नव्हते. गेल्या पाच वर्षात व्यक्तिगत मला आणि माझ्या कुटुंबाला टार्गेट करण्यात आले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकाच व्यक्तीवर बोलले, त्यामुळे त्या सर्वांचे आभार मानतो, कारण त्यांनी माझ्याबाबत बोलून जे वातावरण खराब केले, त्यांनी जे मला टार्गेट केले, त्यामुळे माझ्याबाबतीत सहानुभूती निर्माण झाली. कारण पाच वर्षातील माझे काम लोकांनी पाहिले होते.



त्यामुळे लोकांच्या मनात माझ्याविषयी विश्वास निर्माण झाला आणि त्यांनी मला निवडून आणून दिले, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला.तर, जात जेवढी राजकारण्यांच्या मनात आहे, तेवढी लोकांच्या मनात नाही. समाज एकसंघ झाला आणि त्याचमुळे त्यांनी महायुतीला मतदान केले आहे. महत्त्वाचे म्हणजे गेल्या ३० वर्षात तरी ५० टक्के मतं कोणालाच मिळाली नाही, पण यंदा ती महायुतीला मिळाली. मी तेव्हाही सांगितले होते, की मी आधुनिक अभिमन्यू आहे. मला चक्रव्यूह भेदता येतो. त्यामुळे तो भेदून मी या ठिकाणी उभा आहे, असा इशाराच यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिला. तसेच, याचे श्रेय मी पक्षाला आणि माझ्या सहकाऱ्यांना देतो, असे म्हणत यावेळी त्यांनी शायरी म्हणून दाखवली. यावेळी ते म्हटले की, आंधियो में भी जो जलता हुआ मिल जाएगा, उस दियेसे पुछना मेरा पता मिल जाएगा. असे यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून सांगण्यात आले.

# रेल्वे कामाच्या वाहतुकीमुळे पिकांचे नुकसान

## रेल्वे प्रशासनाने लक्ष देण्याची शेतकऱ्यांची मागणी, सर्वत्र धुळीचे लोट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०यवतमाळ** सध्या तालुक्यामध्ये रेल्वेच्या प्रकल्पाचे काम जोरात चालू असून तालुक्यातील पिंपरी दिवट येथे रेल्वेच्या कामासाठी अनेक टिप्पर वाहन मुरूम, खडक यांची वाहतूक करत आहेत. या वाहनामुळे दिवट पिंपरी शिवारातील शेतकऱ्यांच्या उसाच्या वाहनाला खूप अडचण होत आहे. शेतकऱ्याच्या शेतात भाजीपाला आणि तूर, हरबरा, गहू आणि इतर पिकावर धूळ जास्त प्रमाणात पडत असल्यामुळे शेतकऱ्याचे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे या वाहनाचा नाहक त्रास शेतकऱ्यांना होत आहे.

वसंत सहकारी साखर कारखान्यापासून ते पिंपरी दिवट शिवारात मुरूम खडक घेऊन रेल्वे प्रकल्पाचे काम करण्यासाठी हे टिप्पर वाहन येत असून या वाहतुकीमुळे शेतात व गावात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे त्यांचा परिणाम शेत पिकावर होत असून गावातील वृद्ध माणसाला सुद्धा धुळीची एलर्जी होत असल्यामुळे गावातील लोकांचे शारीरिक स्वास्थ बिघडत आहे. याची गंभीर दखल संबंधित विभागाने घेऊन रस्त्यावर पाणी टाकून वाहने चालू दिल्यास धुळीचा त्रास कमी होईल अशी नागरिकांची मागणी आहे.

राहिलेल्या जमिनीत सुद्धा अशा प्रकारच्या धुळीच्या शेतातील पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. संबंधित विभागाने यावर ताबडतोब उपाययोजना न केल्यास शेतकरी आणि गावकरी मंडळी आंदोलनाच्या तयारीत आहेत. ह्या रस्त्यावरून सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दिवसभर ही वाहतूक चालू राहिल्यामुळे प्रचंड धुळीचा सामना करावा लागत आहे. त्यासाठी रस्त्यावर पाणी टाकून यावर उपाययोजना करावी अशी येथील शेतकऱ्यांची मागणी आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या २७ गोवंशांची सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**ट्रकमधून कत्तलीसाठी आणलेल्या २७ गोवंशांची नागपुरी गेट पोलिसांनी सुटका करून त्यांना जीवनदान दिले. ही कारवाई बुधवारी रात्री लालखडी चौकात केली. या कारवाईत ट्रक जप्त करून चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. लालखडी चौकात ट्रक क्रमांक एमएच ३१ सीक्यू ०८१७ मधून कत्तलीसाठी अवैधरीत्या आणलेले गोवंश खाली उतरवण्यात येत असल्याची माहिती नागपुरी गेट पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी लालखडी चौकात धाड टाकली. या कारवाईत २७ गोवंशांची सुटका करून ट्रक जप्त करण्यात आला. त्यानंतर गोवंशांना दस्तुरनगर येथील गोरक्षणमध्ये दाखल केले. या प्रकरणी ट्रकचालक व मालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई नागपुरी गेटचे ठाणेदार हनमंत उरूलागोंडावार यांच्या मार्गदर्शनात सपोनि अनंता ठाकरे, पीएसआय गजानन विधाते, शिवनाथ आंधळे, आनंद ठाकूर, दिनेश नांदे, इम्रान शेख, दानिश शेख, राहुल रोडे, मोहन तायवाडे यांनी केली.

# आमदार रवी राणा यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे शेतकऱ्यांसाठी घेतला जनता दरबार

## शेतकऱ्यांच्या कामाकरता कोणत्याही प्रकारची हय गय करू नये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती–** बडनेरा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार श्री रवी राणा यांनी बडनेरा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा आमदार बनल्यानंतर प्रथमच आज जिल्हाधिकारी येथे हातुर्णा अळणगाव कुंडखुर्द कुंड सर्जापूर गोपगवान सावरखेड ततारपुर या निम्म्यपेढी प्रकल्पग्रस्त गावांची बैठक व शेतकऱ्यांचा जनता दरबार जिल्हाधिकारी यांच्या दालना मध्ये घेतला. त्यामध्ये महत्तवाचं म्हणजे निम्नपेढी प्रकल्पाचे काम ,प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून त्या प्रकल्पाचा लाभ परिसरातील सात ते आठ गावातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी व्हावा असे आदेश यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना आमदार रवी राणा यांनी दिले . सोबतच हातुर्णा अळणगाव कुंडखुर्द कुंडसर्जापूर या ठिकाणी शासनाच्या वतीने ज्याकाही मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या त्या काहीच नसल्यामुळे तेथे येणे जाण्या करिता रस्ते नाल्या नाही, पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही इमारतीच्या बांधलेल्या आहे त्या अर्धवट पडलेल्या आहेत मैदानासाठी सोडलेल्या जागा त्या मध्ये कोणतेही तारकुंपण नाही अशा प्रकारच्या समस्या घेऊन त्या भागातील सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आमदार रवी राणा यांच्याकडे येऊन संबंधित विभागाबाबत तक्रारी केल्या होत्या त्या तक्रारी ऐकून आमदार रवी राणा यांनी सर्व अधिकाऱ्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक व जनता दरबार घेऊन या प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या तातडीने पूर्ण कराव्या व ज्या काही त्यामध्ये त्रुटी असतील त्या ताबडतोब पूर्ण करून सर्व प्रकल्पग्रस्तांना



मोबदला देऊ त्यांची कामे तातडीने करावे याकरिता सर्व अधिकाऱ्यांना निर्देश दिले त्याचबरोबर या प्रकल्पामध्ये जे भूमीहीन शेतकरी आहे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून ८लाख ५० पन्नास हजार रुपये पॅकेज म्हणून देण्यात यावे ज्या शेतकऱ्यांच्या शेता सरळ पद्धतीने खरेदी केल्या होत्या त्यांना मोबदला म्हणून हेक्टरी ५ लक्ष रुपये देण्यात यावे .ज्या शेतकऱ्यांच्या शेती या प्रकल्पामध्ये गेल्या नाही त्या सर्व शेतकऱ्यांना येण्या–जाण्याकरिता वहिवाट म्हणजेच पांदण रस्ते सुद्धा शासनाने ताबडतोब करून द्यावे अशा सर्व मागण्याबाबत चर्चा करण्यात आली त्याचप्रमाणे सावरखेड ततारपूर या गावाचं पुनर्वसन वलगाव रोडवरील जी कृषी विभागाची आरक्षित असलेली ६५ एकर शेती ती या दोन्ही गावांसाठी आरक्षित करून त्याच ठिकाणी सावरखेड व ततारपुर या गावाचे पुनर्वसन करावं याकरिता सुद्धा आमदार रवी राणा यांनी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिशा निर्देश दिले व लवकरच माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या सर्व बाबींची पूर्तता करून निम्मे पेढि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देऊ असे आश्वासन आमदार रवी राणा यांनी सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिले. या बैठक व जनता दरबाराच्या वेळी अप्पर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, आरडीसी अनिल भटकर साहेब, मिनू मॅडम, तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार श्री येडे साहेब,मंगेश इंगोले, अमोल गोमाशे, आशिष कावरे, नरेंद्र तेलखडे,प्रवीण तायडे, राहुल खोरगडे, अनिल गोमाशे, ज्ञानेश्वर खोरगडे, जनार्दन तायडे, अमोल गोमाशे, मुकुंद खोरगडे, माधव धोटे, सचिन पारिसे, अतुल डाहे, आकाश डाहे, अमित परिहार, अमर खंडारे, योगेश खोरगडे,विनोद जायलवाल, विनोद गूहे,अनुप अग्रवाल, सुरज मिश्रा, कमलेश कारीया, गणेश दास गायकवाड,देवानंद राठोड, ओंकार मोहोळ, उद्धव कराळे, राजू हरणे, श्रीकृष्ण बैलमारे, हरशल रवणे, शेपू पठाण, नीरज गवई, अर्जुन दाते,दिनेश टेकाम,सद्दाम हुसेन,पराग चिमोते दिलीप पाटील, इत्यादी मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त शेतकरी नागरिक उपस्थित होते.

# श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार नंददीप फाऊंडेशनला ससन्मान प्रदान

## नंददीप फाऊंडेशनचे कार्य युवा पिढींसाठी दीपस्तंभ – कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती –** संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्काराच्या निमित्ताने सामाजिक जाणीव व जागृती लोकांमध्ये निर्माण होत आहे. पुरस्काराकरीता आलेल्या प्रस्तावांमुळे समाजजीवनासाठी कार्य करणारे व्यक्ती आजही कार्यरत आहेत, याचा अभिमान वाटतो. नंददीप फाऊंडेशन करीत असलेले मनोरुग्णांसाठीचे कार्य निश्चितच युवा पिढींसाठी दीपस्तंभ आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. २०२४ वर्षीचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार यवतमाळ येथील नंददीप फाऊंडेशनला कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते ससन्मान प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी नंददीप फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री संदीप शिंदे व संचालक श्री अनंत कौलगीकर यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र व दहा हजार रुपयांची रोख देऊन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सन्मान केला. व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, दानदात्यांचे प्रतिनिधी व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, नंददीप फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री संदीप शिंदे, संचालक श्री अनंत कौलगीकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.




### डॉ. पवित्राताई गडलिंगे कुलकर्णी यांचेकडून नंददीप फाऊंडेशनला एक लक्ष रुपयांची देणगी

मूळच्या भातकुली तालुक्यातील हरताळा या लहानशा गावातील रहिवाशी असलेल्या व सध्या ऑस्ट्रेलिया येथे रसायनशास्त्राच्या संशोधक म्हणून कार्य करणा–या डॉ. पवित्राताई गडलिंगे कुलकर्णी यांनी कार्यक्रमात पुरस्कारप्राप्त नंददीप फाऊंडेशनच्या कार्याची चित्रफित पाहून भारावून गेल्या आणि त्यांच्या सामाजिक कार्याला थोडासा हातभार का होई ना म्हणून त्यांनी नंददीप फाऊंडेशनला एक लक्ष रुपयाची देणगी दिली. कुलगुरूंच्या हस्ते नंददीप फाऊंडेशनला ही मदत प्रदान करण्यात आली.

कुलगुरू म्हणाले, स्वत: आणि आपल्या कुटुंबाकडे लक्ष न देता नंददीप फाऊंडेशनचे श्री संदीप शिंदे व त्यांच्या धर्मपत्नी सौ. नंदिनी शिंदे सामाजिक कार्य करीत आहेत. दीनदुबळ्यांसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले आहे. यातूनच ते समाजासाठी जगत आहोत, हेही दिसून येते. ख–या अर्थाने संत गाडगे बाबांचे कार्य श्री संदीप शिंदे यांच्या माध्यमातून आज होत आहे व या माध्यमातून समाजामध्ये सामाजिक कार्याची जाणीवजागृती ते करीत आहेत. नंददीप फाऊंडेशनकडून अशाच प्रकारचे कार्य पुढेही होत राहो, अशा शुभेच्छा देऊन कुलगुरूंनी संस्थेला लवकरच भेट देणार असल्याचेही आश्वास्त केले.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर नंददीप फाऊंडेशनचे संचालक श्री अनंत कौलगीकर आपल्या मनोगतात म्हणाले, सुरुवातीला संघटनात्मक कार्य सुरू केल्यानंतर श्री संदीप शिंदे यांचे कार्य पाहून संस्थात्मक कार्य करण्याचे आम्ही ठरविले आणि त्यासाठी लागणा–या सुविधा, संसाधने उपलब्ध करुन दिलीत. कोरोना काळात संदीप शिंदे यांनी दीड हजारावर नागरिकांना दररोज जेवण दिले. त्यांचे कार्य पाहूनच मग आम्ही संस्थात्मक कार्याचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले.

# निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव

## विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आज रात्री १२.२० मिनिटांनी वाहली जाणार पुण्यस्मरण श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** संपूर्ण महाराष्ट्रातील लाखो भाविक–भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या, वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव संत गाडगेबाबा नगर अमरावती येथील श्री बाबांच्या पवित्र समाधीस्थळी दिनांक १४ डिसेंबर ते २१ डिसेंबर पर्यंत भजन–कीर्तन–हरीनाम– तसेच अन्नदान–वस्त्रदान या सेवाभावी उपक्रमातून सुरू आहे.प्रामुख्याने हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत आज संत गाडगेबाबांना २० डिसेंबर रात्री १२.२० मिनिटांनी पुण्यस्मरण श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. दरम्यान संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात सागर देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांच्या आयोजनातून, श्री बाबांच्या पुण्यतिथी सेवासप्ताह निमित्त गरजूंना अन्नदान–वस्त्रदान तसेच काकड आरती,श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना, भजन–कीर्तन–हरिनाम आदी सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून कर्मयोगी गाडगेबाबांच्या विचारांचा जागर मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडत आहे.

आज सकाळच्या सत्रात पहाटे काकड आरती, श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना, स्वच्छता अभियान, त्यानंतर ह.भ.प. वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांच्या अमृततुल्य वाणीतून भागवत, तदनंतर गरजूंना अन्नदान स्व. सुरेंद्रजी भुंबर व स्व. विनोद भुंबर यांचे स्मरणार्थ श्री सौरभ भुंबर श्री गाडगेबाबा नगर अमरावती, संस्थेतर्फे गोरगरीब गरजूंना वस्त्रदानासह उबदार ब्लँकेट्स चे वितरण, राष्ट्रसंत महिला भजन मंडळ यांचे श्री बाबांच्या जीवनावर भजन, ह.भ.प. लक्ष्मीबाई गहुकार यांचे गाडगेबाबांच्या जीवनावर प्रवचन, सायंकाळच्या सत्रात हरिपाठ, श्री बाबांची सामुदायिक प्रार्थना बापूसाहेब देशमुख व सहकारी, त्यानंतर ऐश्वर्या दीदी खंडारे यांचे राष्ट्रीय कीर्तन, ह.भ.प. ऋषिकेश महाराज रेळे यांची खंजिरी एक्सप्रेस,ह.भ.प. भरतजी रेळे यांचे सप्तखंजेरीतून



समाजप्रबोधन पर कार्यक्रम, रात्री ११:४५ ते १२:०० संत गाडगेबाबांच्या महानिर्वानाबद्दल माहिती विश्वस्त बापूसाहेब देशमुख, त्यानंतर रात्री १२:०० ते १२:१५ श्रद्धांजली गीत सादरकर्ते संत गाडगेबाबा श्रद्धांजली गीत संच, रात्री १२:२० मिनिटांनी श्री बाबांचा स्मृतिदिन व पुण्यस्मरण श्रद्धांजली कार्यक्रम हजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

या भावपूर्ण कार्यक्रमाकरिता भाविक भक्तांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री बापूसाहेब देशमुख व व्यवस्थापक प्रकाश महात्मे, उत्सव समिती प्रसिद्धीप्रमुख गजानन देशमुख यांनी केले आहे.

नष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या अंत्यसंस्कार समयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी त्यांना मुखाग्नी दिला. त्यापूर्वी भुसावळ रेल्वे स्टेशनवर २१ डिसेंबर १९५६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी श्री बाबांवर श्रद्धांजलीपर गीत म्हटले, सुनी खबर की संत गाडगेबाबा हमको छोड गये,धडक भरी छाती मे हमको पल भर तो नही होश रहे, या भावपूर्ण श्रध्दांजली पर गीतातून श्री बाबांना पुण्यस्मरण श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल.विशेषत: श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथि महोत्सव कार्यक्रम तसेच स्मृतीदिन व पुण्यस्मरण श्रद्धांजली श्री गाडगेबाबा समाधीस्थळ अमरावती या अधिकृत फेसबुक पेज वरून लाईव्ह प्रसारित करण्यात येईल,अशी माहिती संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख सतीश टाले यांनी दिली आहे.

# आजपासून महानुभाव आश्रम शतकपूर्ती महोत्सव

## सरसंघचालक मोहन भागवत, सीएम फडणवीस, योगी आदित्यनाथ, उपस्थित राहणार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

महानुभाव आश्रम राजापेठ कंवरनगर अमरावती या आश्रमास शंभर वर्ष पूर्ण झाल्यामुळे २० ते २२ डिसेंबर दरम्यान शतकपूर्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यातिनदिवसीय सोहळ्याच्या पहिल्यादिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### महानुभान आश्रम राजपेठ येथे सोहळ्याचा होणार शुभारंभ

### सायंस्कोर मैदानावरून निघणार भव्य शोभायात्रा

### २२ डिसेंबरपर्यंत ३ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन





शेवटच्या दिवशी रविवार २२ डिसेंबरला सरसंघचालक मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, युपीचे मंत्री ब्रजेशसिंह, राज्यमंत्री के.पी.मलिक प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवाचा शुभारंभ २० डिसेंबरला होणार असून राजापेठ आश्रमयेथे

२० डिसेंबरला महानुभाव आश्रमराजापेठ येथे सकाळी आठ वाजता पासून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने कारंजेकर पिढीतील श्री दत्तात्रय प्रभूचा 'दाढे 'उपहार महोत्सव व पंचावतार उपहार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला महानुभाव पंथातील प्रमुख आचार्यगण, संत महंत पंचक्रोशितील भाविक भक्तगणमोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

त्यानंतर दुपारी तीन वाजता सायन्सकोर मैदानातून शोभायात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये उंट, घोडे, रथ , भक्तगण, बँड पथक, दिंडीं-पालखींचा समावेश राहणार आहे. ही शोभायात्रा सायन्सकोर मैदानतेराजकमल चौक, राजापेठ मार्गे महानुभाव आश्रम राजापेठ येथे ोहचल्यानंतर समारोप होईल. त्यानंतर शनिवार २१ डिसेंबर जीचे कार्यक्रम भानखेडा येथे आयोजित केले आहे. या ठिकाणी सकाळी ९ ते ११ वा. पर्यंत संन्यासायचा पंचावतार उपहार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी तीन वाजता धर्मसभा आयोजित केली आहे. याकार्यक्रमाला प्रामुख्याने प्रमुख आचार्यगण संतमहंत तसेच भाविक भक्त यांची उपस्थिती

तिसऱ्या दिवशी रविवार २२ डिसेंबरला सकाळी नऊ ते दहा ध्वजारोहण इतर धार्मिक कार्यक्रम होतील. या कार्यक्र माला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , तसेच सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, युपीचे मंत्री ब्रजेश सिंह, राज्यमंत्री के. पी. मलिक आदींसह अन्य गणमान्य उपस्थित राहणार आहे. सकाळी १० वाजता सरसंचालक मोहन भागवत यांच्या यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन तसेच सप्त काव्यग्रंथाचे - वशताब्दी निमित्त स्मरणिका प्रकाशन, मान्यवरांच्या हस्ते व सत्कार समारंभ, धर्मसभा होईल. त्यानंतर शताब्दी कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

# नाताळासाठी बेल्स, खेळण्यांनी बाजार सजला

## सांताक्लॉजचा मुखवटा, ख्रिसमस बॉल्स, ट्री, टोप्या यांची खरेदी जोरात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती -** नाताळासाठी दुकाने सजली आहेत. ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी पताका यासह सांताक्लॉजची कपडे खरेदीसाठी गर्दी होऊ लागली आहे. विविध चौकांसह दुकानांमध्ये आवश्यक वस्तूंची रेलचेल पाहायला मिळत आहे.

शहरातील प्रमुख बाजारपेठेतील दुकानांमध्ये वस्तूंची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. बाजारात सांताक्लॉज, बेल्स, चांदणी, खेळणी, सांताक्लॉज असलेले हेअर बँड, येशू व मेरी यांचे पुतळे, रोषणाई व विविध प्रकारच्या सजावटीचे साहित्य, होली रीट, बेल्स, प्रभू येशू आणि मेरी यांच्या मूर्ती, सांताक्लॉजची कपडे, चांदणी, खेळणी, सांताक्लॉजचा मुखवटा, ख्रिसमस बॉल्स, ट्री आणि टोप्या खरेदी करण्यासाठी बाजारात हळूहळू गर्दी होत असल्याचे चित्र आहे.


कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये नाताळचे सेलिब्रेशन होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील उत्साह संचारला आहे. सांताक्लॉजची मुखवटे, टोप्या खरेदीकडे विद्यार्थ्यांचा कल असून लाल आणि पांढऱ्या रंगाच्या सांताक्लॉजच्या पेहरावाला अधिक मागणी आहे. ख्रिसमस ट्रीसह विविध गोष्टी ग्राहक खरेदी करताना दिसत आहेत. त्यात गृह सजावटीसाठी बाजारात मेणबत्तीच्या अनेक डिझाइन्स विक्रीसाठी आल्या आहेत.

नाताळ हा येशूंचा जन्मदिवस साजरा करण्याचा उत्सव आहे. यामध्ये येशूला अधिक महत्त्व दिले जाते. बाजारात येशू व मेरी यांच्या जीवनपटाची कहाणी, माहिती होण्यासाठी पुतळा स्वरूपी येशू प्रकटले आहेत. येशूंच्या जन्म ते मृत्यूपर्यंतची कहाणी सांगण्यासाठी विविध प्रकारच्या पुतळ्यांचा आधार घेऊन त्याचा एक संच तयार करून त्या संचाच्या आधारे त्यांचे जीवन रेखाटले आहे. तीनशे ते हजार रुपयांपर्यंत हा संच उपलब्ध आहे.

स्नो ख्रिसमस ट्री आकर्षक नाताळात वेगवेगळ्या प्रकारचे ख्रिसमस ट्री नागरिकांच्या पसंतीस पडतात. बाजारपेठेत नेहमीच्या ख्रिसमस ट्रीपेक्षा स्नो-ट्री आणि चेरीचे अधिक आकर्षण आहे. स्नो ट्रीवर बर्फ असल्याचे भासवून स्नो ट्री उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, ख्रिसमस ट्रीच्या भोवताली विद्युत रोषणाई आणि चेरी ठेवली असल्याने ट्रीवर आधीच सजावट केलेली आहे. स्नो ट्री १०० ते १५०० तर चेरी ट्री २०० ते ३००० रुपयांना बाजारात उपलब्ध आहे.

# रोज एक नवीन प्रकरण काढणं चालणार नाही

## प्रार्थनास्थळांवरील दाव्यांवर मोहन भागवतांचे विधान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०पुणे -** सध्या देशात सुरु असलेल्या हिंदू मंदिरांबाबतच्या वादावरुन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने महत्त्वाचे विधान केलं आहे. कोणत्याही प्रार्थनास्थळांखाली हिंदू मंदिरे असण्याचा दावा करणे अस्विकारहार्य असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचालक सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटलं आहे. वेगवेगळ्या धर्मियांना आणि विचारधारांना सलोख्याने भारतात राहण्यासाठी योग्य वातावरण निर्माण व्हावं अशी अपेक्षा मोहन भागवत यांनी व्यक्त केली. सरसंघचालक मोहन भागवत हे पुण्यात सुरू असलेल्या एका व्याख्यानमालेत बोलत होते.

भारत विश्व गुरु झाला पाहिजे असं प्रत्येक भारतीयाला वाटतं. भारत विश्वगुरु झाला तर ठेकेदारी बंद होईल. कारण भारताची निर्मितीच परोपकारासाठी झाली आहे असं मोहन भागवत यांनी सांगितले. आगामी वीस एक वर्षात भारत विश्वगुरु होईल, अस मतही त्यांनी व्यक्त केलं. अयोध्येत राम मंदिर व्हावं असं हिंदूंना वाटायचं, त्याप्रमाणे राम मंदिर पूर्णही झालं. मात्र राम मंदिरासारखं आंदोलन पुन्हा करुन नेता होता येत नाही असंही त्यांनी बजावलं आहे. राम मंदिरासारखी आंदोलने अन्य प्रार्थनास्थळी करणे योग्य नाहीये, असेही मोहन भागवत म्हणाले.देशात अल्पसंख्याक किंवा बहुसंख्य असं काही नाही, सर्वांना त्यांच्या इच्छेनुसार पूजा प्रार्थना करण्याची संधी मिळायला हवी असे मोहन भागवत म्हणाले.

आपल्या देशाचे संविधान आहे. त्यातील काही भाग संसद बदलते. कायदे बदलतात, नियम बदलतात. पण चार गोष्टी न बदलणाऱ्या आहेतय संविधानाची प्रस्तावना, संविधानातली मार्गदर्शक तत्वे, संविधानातील नागरिकांची कर्तव्य, नागरिकांचे अधिकार या चार गोष्टी कुठल्या आहेत याचं आपल्या घरी प्रबोधन झालं पाहिजे आणि श्रद्धापूर्वक त्याचे आचरण जीवनात केले पाहिजे, असं मोहन भागवत यांनी म्हटलं.

भारत विश्वगुरू व्हायला फार वेळ लागणार नाही. वीसएक वर्षात आपण ते स्थान गाठू शकू. राम मंदिर झालं पाहिजे ते होत आहे. हिंदूंचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे ते वाटतं. परंतु असं केलं म्हणजे हिंदूंमध्ये नेता होता येत नाही. अतिरेकी भूतकाळाच्या ओझ्याच्या परिणामामुळे तिरस्कार, द्वेष, शत्रुता, संशय याच्या पोटी रोज एक नवीन प्रकरण काढणे हे कसे चालणार. हे नाही चालणार. आपला देश आता संविधानानुसार चालतो. जनता आपली प्रतिनिधी निवडून देते. जे निवडून येतात ते राज्य चालवतात. राज्य जनतेचे असते, असंही मोहन भागवत म्हणाले.

विश्वशांतीची घोषणा करून विश्वशांतीची आम्हाला शिकवण देऊन जगात वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न होत आहे. ज्यांना चांगले व्हायचे असते ते दिखावा न करता चांगले होतात. बाहेरून आलेल्यांनी देशावर राज्य केले. त्यातून आपण आपला इतिहास विसरलो. अशा वेळी आता आपण वाचले पाहिजे, शिकले पाहिजे. त्यामुळे आपली ताकद दाखवण्याची, आपली शस्त्र दाखवण्याची गरज आहे, असं मोहन भागवत म्हणाले.

# आष्टी येथे दोन गोठ्याला आग, दोन बैल जखमी

## तीन लाखांचे साहीत्य जळून खाक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० टाकरखेडा संभू** नजिकच्या आष्टी येथे दोन गोठ्याला बुधवारी मध्यरात्रीनंतर आग लागली. या आगीत दोन बैल गंभीर जखमी झाले असुन शेतीचे अवजारे, २५ बंड्या कुटार, टिन शेड आदी सुमारे तीन लाखांचे नुकसान झाले आहे.अग्नीशमन दलाने रात्री उशीरा या आगीवर नियंत्रण मिळविले.महसुल विभागाने घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

भातकुली तालुक्यातील आष्टी येथील रहीवासी संतोष डोंगरे यांच्या गोठ्याला रात्री दोन ते अडीच वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. या गोठ्यातील सुमारे दोन ते दिड लाखांचे साहीत्य जळून खाक झाले असुन नजिक दोन बैल बांधले होते. ते देखील आगीच्या लपेटात आल्याने गंभीर जखमी झाले आहे. या दोन्ही जणावरांवर तातडीने पशुवैद्यकीय अधिकारी यांनी उपचार केले. या आगीत शेतीचे अवजारे,१५ बंड्या कुटार, टिन शेड पुर्णता जळाले आहे. तसेच संतोष डोंगरे यांच्याच शेजारी असलेल्या पुरूषोत्तम डोंगरे यांच्याही गोठयाला आग लागल्याने त्यांचे शेतीचे अवजारे, १० बंड्या कुटार, टिन शेड असे ५० ते एक लाख रूपयापर्यंत नुकसान झाले आहे.

# किमान तापमान पुन्हा घसरले ८.५ अंशांपर्यंत

## 3 दिवसांत १४ अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

दोन दिवसांपासून शहरात किमान तापमान सकाळी ७.३० वाजता ८.५ अंश सेल्सियस नोंदवण्यात आले. त्यामुळे पुन्हा थंडी वाढली आहे. दोन दिवसांत किमान तापमानात ८.१ वरून १०.५ अंश सेल्सिअस व पुन्हा गुरुवारी ८.५ अंश सेल्सियस असा बदल दिसून आला. पुढील तीन ते चार दिवसांत बंगालच्या उपसागरातील हवेच्या कमी दाबाचा पट्टा व तामिळनाडूच्या दिशेने सरकणाऱ्या वादळामुळे तापमान हे १४ अंश सेल्सियसपर्यंत वाढणार असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.काही दिवस तापमान १३ ते १४ अंश सेल्सियस राहिल्यानंतर हवेच्या कमी दाबाचा पट्टा निवळला की, पुन्हा पारा ८ ते ९ अंशा पर्यंत खाली घसरू शकतो.

> वातावरणातील बदलाने तापमानात चढ उतार वातावरणात होत असलेल्या बदलामुळे तापमानात चढ-उतार दिसून येत आहेत. कधी कमी तर कधी जास्त तापमानाची नोंद होत आहे. सध्या असलेल्या किमान तापमानात ३ ते ४ अंशांनी वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.
>
> **- प्रा. अनिल बंड, हवामान अभ्यासक-**

# तलाठ्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीवर कारवाईची मागणी

## विदर्भ पटवारी संघटनेचे एसडीओंना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०यवतमाळ-** राळेगाव तालुक्यातील वाढोणा येथील तलाठी मिलिंद लोहत यांच्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीवर कायदेशीर कारवाई करावी यामागणीचे निवेदन बुधवारी दि. १९ डिसेंबर रोजी विदर्भ पटवारी संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना दिले. वाढोणा बाजार येथील तलाठी मिलिंद लोहत दैनंदिन कामकाज पार पडल्यानंतर तलाठी कार्यालयात मुक्कामी होते. मंगळवारी रात्रीच्या सुमारास रेती चोरी करणारे प्रतिक बाढोणकर याच्यासह दोघांनी कार्यालयात जावून प्राणघातक हल्ला केला. झालेल्या हल्ल्यातमिलिंद लोहत यांना डोक्याला व पायाला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली आहे. त्यामुळे संबंधित आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच यापुढे वाळू कार्यवाहीसाठी असलेल्या पथकात पोलिस कर्मचारी तसेच नायब तहसिलदार दर्जाचा अधिकारी असल्याशिवाय कोणीही तलाठी तसेच मंडळ अधिकारी कार्यवाही साठी जाणार नाही. यासह मागणीचे निवेदन विदर्भ पटवारी संघाकडून उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. यावेळी गजानन साखरकर, राहुल निशाणे, मोहन चंदणे, कैलास बानाईत, मिलींद गुबरे यांसह कार्यकर्ते, परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची स्मृती मंदिर परिसरात दांडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर :** विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप व शिंदे गटाच्या बहुतांश आमदारांनी गुरुवारी रेशीमबागेतील स्मृती मंदिराला भेट दिली मात्र भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांनी मात्र स्मृती मंदिर परिसरात दांडी मारली. शिवाय आशिष देशमुख. शिंदे गटाचे निलेश राणे यांनी मारलेल्या दांडीची चर्चा परिसरात अधिक रंगली.

विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशनाच्या काळात दरवर्षी भाजपचे सदस्य स्मृती मंदिर परिसर भेट देत असतात. यावर्षी भाजपसह महायुतीच्या सर्व आमदारांना अधिवेशन सुरू पत्र देत निमंत्रण देण्यात आले होते. त्यामुळे भाजपच्या सर्व आमदारांनी स्मृती मंदिर परिसरात भेट देणे आवश्यक असताना राज्याच्या मंत्री असलेल्या पंकजा मुंडे, आशिष



देशमुख, शिंदे गटाचे निलेश राणे, भरतशेठ गोगावले यांच्यासह भाजपचे २० आमदार व शिंदे गटाचे १० आमदार स्मृती मंदिराकडे फिरकले नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. सर्व आमदारांनी आद्य सरसंघचालक केशव बळीराम हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. दरवर्षी स्मृती मंदिर परिसराला भेट देणाऱ्यादी यादी तयार केली जाते मात्र यावेळी अशी कुठलीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. यावेळी महर्षी व्यास सभागृहात संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे यांनी संघाच्या सेवा प्रकल्पांची माहिती दिली.

अनुपस्थित आमदारांबाबत पक्षाचे प्रवीण दरेकर यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले, प्रत्येक आमदाराना निमंत्रण दिले जाते. मात्र काही सदस्यांनी वैयक्तिक अडचणींमुळे अनुपस्थित राहणार नसल्याचे आधीच पक्षातील वरिष्ठांना कळवले आहे.

जे आमदार आले नाही ते आज किंवा उद्या भेट देतील असही दरेकर म्हणाले. अजित पवार गटाचे आमदार का आले नाही याची माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले.

# तीळ आताच घेऊन ठेवा; संक्रांतीला महागणार
## गतवर्षीच्या तुलनेत यंदा तीळ-गुळाचा भाव कमी



### गुळाचे दर यंदा स्थिर

गतवर्षी गुळाचे ठोक भाव ३६०० ते ३८०० रुपये क्विंटल होते. गत महिन्यापासून नवीन गुळाचे उत्पादन बाजारात येत आहे. त्यामुळे किरकोळ भाव ४० ते ४५ रुपये किलो आहे. गावरान गुळाचा भाव ५५ ते ६० रुपये किलो आहे.

### यंदा तिळगूळ महागणार

यंदा उत्पादन वाढल्याने बाजारात आवक वाढली आहे. त्यामुळे तिळाचे सध्या किरकोळ दर १६५ ते १७५ रुपयांपर्यंत आहेत, तर गुळाचे दरही गतवर्षीच्या तुलनेत साधारण आहेत. त्यामुळे तीळगूळ यंदा महाग होण्याची शक्यता नसल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले. गेल्या वर्षी २००; यंदा १७०गतवर्षी संक्रांत काळात तिळाचा भाव - २०० रुपये किलोपर्यंत पोहोचला होता. यंदा मात्र काहीशी घसरण झाल्याने तिळाचा भाव २६५ ते १७५ - रुपये किलो आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

जानेवारीत येणाऱ्या संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बाजारात तीळ, गूळ आणि तीळगुळाचे पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे. तिळाचे दर यंदा गतवर्षीच्या तुलनेत किलोमागे साधारण २५ ते ३० रुपयांनी कमी आहेत; परंतु दिवसेंदिवस मागणी वाढणार असल्याने तिळाच्या दरात आणखी वाढ होण्याची चिन्हे आहेत.

सध्या भंडारा येथील किरकोळ बाजारात तिळाचे दर १६५ ते १७५ रुपये किलो आहेत. तर गुळाचे दरही गतवर्षीप्रमाणेच स्थिर असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले. सूर्याचे मकर राशीत संक्रमण होणारे पर्व म्हणजे संक्रांत. या दिवशी पारंपरिक पद्धतीने भारतीय संस्कृतीनुसार पूजन करून सण साजरा करतात.या कालावधीत हिवाळा असल्याने तिळाला मागणी असते. कॅल्शियम व इतर महत्त्वाचे पौष्टिक घटक असल्याने तिळाचे विविध पदार्थ बनविले जातात. तर शत्रुत्व विसरून स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी तीळगूळ, तिळाचे लाडू किंवा तीळगुळाचे पदार्थ एकमेकांना देऊन तीळगूळ घ्या, गोड बोला, असा संदेश मकर संक्रांतीला दिला जातो. सणामुळे तिळाला मागणी असते.गतवर्षी नैसर्गिक आणि विविध कारणांमुळे तिळाच्या दरात तेजी होती. किरकोळ बाजारात तिळाचा भाव २०० रुपयांपर्यंत पोहोचला होता. मात्र या वर्षी तिळाचे उत्पादन भरपूर झाल्याचे सांगण्यात येते. दिवाळीनंतर तिळाच्या दरात किलोमागे दहा रुपयांची घसरण झाली. तर सध्या किरकोळ बाजारात १६५ ते १७५ रुपये किलो असा दर आहे.

## नव्या वर्षात पावसाचं प्रमाण कसं असणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० मुंबई**


नव्या वर्षाची सुरुवात होण्यासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. लवकरच आपण नव्या वर्षात पदार्पण करणार आहोत.नवं वर्ष आपल्याला कसं जाणार? नव्या वर्षात पाऊस पाणी कसा असणार याबाबत सर्वांनाच मोठी उत्सुकता असते.

कारण भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे येथील बहुतांश अर्थव्यवस्था आजही पावसावर अवलंबून आहे. मान्सूनचा पाऊस चांगला झाल्यास मार्केटमध्ये तेजी दिसून येते.

नव्या वर्षात एक खूषखबर आहे, ती म्हणजे या वर्षी देशभरात पावसाचं प्रमाण चांगलं राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज जागतिक हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

जागतिक हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदानुसार पुढील वर्षी २०२५ मध्ये चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे जानेवारी ते फेब्रुवारी या काळात जगभरात ला निनासाठी अनुकूल वातावरण बनत असून, या काळात ला निना सक्रिय होण्याची शक्यता ५५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

# आजपासून बहिरम यात्रेला सुरुवात
## भविकांसह पोलीस यंत्रणा सज्ज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०बहिरम**

जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासात भर घालणारे सिद्ध तीर्थक्षेत्र बहिरमच्या यात्रेला शुक्रवारपासून सुरुवात होत आहे. रोडग्याच्या जेवणाची प्रतीक्षा असलेल्यांची रेलचेल आज दि. २० डिसेंबर या बहिरम यात्रेच्या पहिला दिवसापासून राहणार आहे

बहिरम यात्रेत ब्रिटिशांचीही वर्दळ राहायची. इंग्रजही यात्रेचा आनंद घ्यायचे. यात्रेदरम्यान त्यांचा मुक्काम तंबू (राहुटी) मध्ये राहायचा. त्यावेळी बहिरम यात्रेची सुरुवात कारंजा बहिरम येथील शंकरराव चंद्रभानजी चौधरी यांच्या चंचई (बटवा) मधील पानसुपारीने व्हायची. १९३८ पर्यंत यात्रेच्या निमिताने त्यांच्या पानसुपारीला मान होता. इंग्रजही शंकररावांना आवर्जून चंचईतील पानसुपारी मागायचे. बहिरम यात्रेची व्यवस्था शंकरराव बघायचे. आज पानसुपारी ऐवजी बहिरमबुवाला रोडग्याचा नैवेद्य दाखवून यात्रेची सुरुवात होते.

१९३८ ते १९६२ दरम्यान बहिरम यात्रेचे व्यवस्थापन जनपदकडे होते.पुढे यात्रेचे व्यवस्थापन चांदूरबाजार पंचायत समितीकडे आले आणि नियोजन आखले जाऊ लागले. कृषिप्रधान असलेल्या या यात्रेचे अलीकडे स्वरूप बदललेले असले तरी राहुट्यांची संस्कृती आजही कायम आहे. यात्रा परिसरात राहुट्या लागायला सुरुवात देखील झाली आहे. बैलगाड्यांची परंपरा आदिवासी बांधवांनी जपून ठेवली आहे. आदिवासी बांधव आजही बैलबंड्या घेऊनच यात्रेत येतात.बहिरम यात्रेतील राहुटीचे शहरी संस्कृतीला आकर्षण असून, रोडगे आणि हंडीतील भाजीच्या जेवणाचा आस्वाद घेण्याकरिता या बहिरम यात्रेची आवर्जून वाट बघितली जाते. बहिरम यात्रेची रोडग्याचे जेवण ही आज ओळख ठरली असून येथील हंडी 'ब्रँड' म्हणून शहरी भागातही वापरला जात आहे. राष्ट्रसंतमहाराजांची खंजिरी आणि संत गाडगेबाबांच्या कीर्तनाने बहिरम यात्रेत परिवर्तन केले आहे. २० डिसेंबरपासून सुरू होणारी ही यात्रा पुढे जानेवारी २०२५ च्या अखेरपर्यंत चालणार आहे.

**गर्दीचे विक्रम**

सर्वाधिक दिवस चालणारी ही यात्रा विदर्भातच नव्हे, अन्य राज्यातही प्रसिद्ध आहे. दूरदुरून यात्रेकरू बहिरम यात्रेत आपली हजेरी लावतात. रविवार हा बहिरमबुवांचा दिवस. या दिवसाला सर्वाधिक गर्दी उसळते. आजवर यात्रेने गर्दीचे अनेक विक्रम आपल्या नावावर नोंदविले आहेत. गतवर्षीच्या गर्दीचे विक्रम पुढील वर्षात मोडण्याची परंपरा या यात्रेने जपली आहे. त्यामुळे यंदा यात्रेत होणारी संभाव्य गर्दी आणि पडणारी थंडी याविषयी वेगवेगळे अंदाज आतापासूनच बांधायला सुरुवात झाली आहे.

# पंचायत राज संस्थेचे कामकाज, विकासकामे जाणून घेणार
## जिल्ह्यातील सरपंच उत्तराखंडच्या अभ्यास दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान सन २०२४-२५ अंतर्गत पश्चिम विदर्भातील ४० सरपंच व अधिकाऱ्यांची चमू पंचायतराज विभागामार्फत करण्यात येणाऱ्या विविध नावीण्यपूर्ण कामांचा अभ्यास करण्यासाठी उत्तराखंड राज्याच्या अभ्यास दौऱ्यावर गेले आहेत. यामध्ये जिल्ह्यात स्मार्ट ग्राम स्पर्धेत बाजी मारलेल्या सात गावांचे सरपंच व पाच अधिकारी व ग्रामविकास अधिकारी असे एकूण १२ जणांचा यात समावेश आहे.

उत्तराखंड सरकारने राज्यात राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियानाच्या माध्यमातून केलेल्या विविध नावीण्यपूर्ण योजनेतून केलेला बदल. उत्तराखंड सरकारच्या माध्यमातून ग्राम संसदमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना, प्रशासकीय कामकाज, ग्रामसंसदने केलेली स्थानिक पातळीवरील कामे, ग्राम स्वच्छता अशा विविध बाबीचा अभ्यास दौऱ्यात केला जात आहे.




दरम्यान, जिल्ह्यातील अभ्यास दौऱ्यावर गेलेल्या स्मार्ट ग्राम पुरस्कार प्राप्त गावांच्या सरपंच व अधिकारी, तसेच कर्मचाऱ्यांनी उत्तराखंड देहरादूनमधील सहसपुर, कालसी, पंचायत समिती आणि रामपूरभाऊ ग्रामपंचायतीला भेट देऊन तेथील प्रशासकीय कामकाज, विकास कामांची पाहणी करून मुद्देसूद माहिती आणून घेतली आहे. सलग आठवडाभर उत्तराखंड राज्यातील विविध जिल्ह्यात भेटी देऊन योजना व प्रशासकीय कामकाजाचा अभ्यास करणार आहे. या सातदिवसीय दौया जिल्ह्यातीलअचलपूरचे बीडीओ सुधीर अरबट, तिवसा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पांडुरंग उलेमाले, अमरावती, ज्योती इसळ, नांदगाव खंडेश्वर, अनुराधा विधळे, मोर्शी या तीन तालुक्यांतील ग्रामविकास अधिकाऱ्यासह अचलपूर तालुक्यातील वाघडोहचे सरपंच्या भाग्यश्री लंगोटे, वलगांवचे सरपंच सुधीर उगले, अनुपमा ठाकरे, सरपंच उनीवेलखेडा चांदूर बाजार, वर्षा वानखडे सरपंच, पार्टी मोर्शी, स्नेहल कडू अशोकनगर धामनगाव रेल्वे, माधुरी गाढवे चंडीकापूर दर्यापूर, लक्ष्मण भिलावेकर राणीगाव धारणी आदी सरपंच या अभ्यास दौऱ्यात सहभागी झाले आहेत.

# शालेय पोषण आहाराच्या पेंडिंग अनुदानाचा मार्ग मोकळा
## शाळांना अनुदान प्रस्ताव सादर करण्याचे शिक्षण संचालकांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती :**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्रीपोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अंडी, केळी देण्यात येतात. त्यासाठी शाळांना प्रलंबित राहिलेले तसेच चालू वर्षातील अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे. शाळांनी त्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शिक्षण विभागाला दिले आहे.



शाळास्तरावर २०२३-२४ या कालावधीमध्ये नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान आठवड्यातील एक दिवस अंडे देण्याचा २०२४.२५ मध्ये विस्तरीय आहार रचनेप्रमाणे दोन आठवड्यांतून एकदा अंडा पुलाव देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अमरावतीसह अनेक आणि केंद्रीय स्वयंपाकगृह संस्थांनी अंडी आणि केळी वाटपासाठीचे अनुदान मिळालेले नव्हते नोव्हेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ दरम्यान शाळा अथवा केंद्रीय स्वयंपाकगृहाला द्यायचे अनुदान आणि शाळांना यापूर्वी वितरित शाळांच्या अग्रिम रक्कम, उर्वरित देयकांच्या फरकाची रक्कम अशी अनदान मागणी नोंदवावी लागेल

**माहिती संकेतस्थळावर भरणे आवश्यक**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात त्रिस्तरीय आहाराचा लाभ संबंधित शाळांनी तसेच केंद्रीय स्वयंपाकगृह संस्थांनी विद्यार्थ्यांना दिला असल्याची खात्री करून मुख्याध्यापकांमार्फत प्रमाणित करून घ्यावे तसेच जिल्हास्तरावर केंद्रीय स्वयंपाकगृह संस्थांकडील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र दप्तरी ठेवण्यात यावेत. शाळांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या नियमित आहाराची माहिती एमडीएम संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे. शाळा नियमितपणे एमडीएम संकेतस्थळावर दैनंदिन उपस्थितीची माहिती नोंदणीचे पडताळणी होईल.

# उद्या श्री हव्याप्र मंडळाच्या योग विभागात आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस - कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० अमरावती**

शनिवार, दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी, आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसाच्या निमित्ताने, योगशास्त्र विभाग, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती; स्वस्थवृत्त व योग विभाग, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती; आणि श्री ह. व्या. प्र. मंडळ, भारतीय ज्ञान परंपरा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

ध्यान हे मानसिक आणि आत्मिक उन्नतीसाठी मदत करते. ध्यानामुळे व्यक्तीला स्वतःची ओळख होते. मनोविकारांवर नियंत्रण आणणे व मनाला स्थिर ठेवणे यासाठी ध्यान उपयुक्त ठरते. अनियंत्रित मनाला नियंत्रित करण्यासाठी ध्यान हे प्रभावी साधन आहे. यंदा प्रथमच २१ डिसेंबरला संपूर्ण जगभरात जागतिक ध्यान दिवस साजरा केला जात आहे.



श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या योगशास्त्र विभागामध्येही आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी डॉ. सूर्यकांत पाटील (माजी विभाग प्रमुख, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती) मार्गदर्शन करतील. हा कार्यक्रम ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही माध्यमांतून होणार आहे.

जे सहभागी होऊ शकत नाहीत त्यांनी कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे: https://forms.gle/nUTBUhbNZwYF499s8 किंवा ८२७५७५३६४८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

या आंतरराष्ट्रीय ध्यान दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या निःशुल्क कार्यशाळेत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, भारतीय ज्ञान परंपरा केंद्र, अमरावतीच्या समन्वयक डॉ. माधुरी चेंडके; प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे (डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती); आणि डॉ. सुनील लबडे (योगशास्त्र विभाग प्रमुख, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती) यांनी केले आहे

# लग्नाला निघालेली बस ताम्हिणी घाटात उलटली
## ५ वऱ्हाड्यांचा मृत्यू, २५ पेक्षा जास्त जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०माणगाव**

लग्नाला निघालेल्या वऱ्हाडाच्या बसवर काळाने झडप घातली. पुणे-दिघी महामार्गावर ताम्हिणी घाटात कोंडेथर गावच्या हद्दीत बस उलटून भयंकर अपघात झाला. शुक्रवारी (२० डिसेंबर) सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पुण्याहून




बिरवाडीकडे लग्नासाठी निघालेली खासगी बस (एमएच १४ जीयू ३४०५) पुण्याहून माणगांवकडे येत होती. बस ताम्हिणी घाटात अवघड वळणावर आल्यानंतर रस्त्याच्या बाजूला पलटी झाली. हा अपघात इतका भीषण होता की, बसमधील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला.२५ पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणण्यात आले आहे.

**मयतांची नावे**

मृतांमध्ये ३ महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. संगिता धनंजय जाधव, गौरव अशोक दराडे, शिल्पा प्रदीप पवार, वंदना जाधव अशी मृतांची नावे असून, एका मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

# मुंबईत ३१ डिसेंबरपूर्वी एनसीबीची मोठी कारवाई, १५ कोटींचे ड्रग्स जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० मुंबई**

नवीन वर्षाच्या आगमनास काही दिवस राहिले आहे. तरुणाई नवीन वर्षाच्या स्वागतासाठी उत्सुक असते. यामुळे ३१ डिसेंबर रोजी मोठ्या प्रमाणावर दारुची विक्री होत असते. तसेच अनेक ठिकाणी ड्रग्सही विकले जाते. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमिवर अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (एनसीबी) विभाग सक्रीय झाला आहे. एनसीबीने मुंबईत मोठी कारवाई करत ५ कोटी २० लाखांचे ड्रग्स जप्त केले आहे. दोन कारवाईत हे ड्रग्स जप्त करण्यात आले आहे.

**दुसरी कारवाई विमानतळावर**

मुंबई विमानतळावर थायलंडमधून भारतात येणारे ड्रग्स पकडले. या तस्करीत मोठे रॅकेट असल्याचे उघडकीस आले आहे. थायलंडमधून बँकॉक आणि नंतर मुंबईत आलेले ड्रग्सचे पार्सल एनसीबीने पकडले आहे. त्यातून १३ किलो हायब्रिड स्ट्रेन गांजा सापडला आहे. या गांजाची तस्करी करण्यात कोल्हापूरची एक व्यक्ती असल्याचे समोर आले. त्या संशयित व्यक्तीला एनसीबीने अटक केली आहे. दोन वेगवेगळ्या कारवाईत १५ कोटी २० लाखांचे ड्रग्स जप्त झाले.

काही दिवसांपूर्वी नवी मुंबई शहरामध्ये बारा कोटी रुपयांचा ड्रग्स जप्त करण्यात आले होते. नवी मुंबई गुन्हे शाखाने विविध भागात २५ ठिकाणी छापेमारी केली होती. त्यात अंमली पदार्थ विरोधी कारवाईच्या अंतर्गत १३ नायजेरियन लोकांना पोलिसांनी घेतले. तसेच तीन नायजेरियनकडे कागदपत्रे नसल्याने त्यांना ताब्यात घेतले होते. नायजेरियनकडून पोलिसांनी बारा कोटी रुपयांचे ड्रग्स मिळाले होते.

# गुड मॉर्निंग पथके गेली कुठं?

## घर तिथे शौचालय असूनही वापराच्या नावाने बोंबाबोंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अचलपूर**

'स्वच्छ भारत मिशन'च्या माध्यमातून 'घर तिथे शौचालय' बांधण्यात आले आहे. एवढेच नाही तर सार्वजनिक शौचालयेही उभारली आहेत. असे असतानाही अनेक कुटुंबांकडून स्वच्छतागृहाचा नियमित वापर केला जात नाही. त्यामुळे आजही गावांमध्ये प्रवेश करताना लोकांना नाकासमोर रुमाल धरल्याखेरीज गत्यंतर नसते. अशा लोकांवर कारवाई करण्यासाठी गुड मॉर्निंग पथके स्थापन केली होती. परंतु, कोरोनापासून ही पथके कार्यान्वितच नाहीत, हे विशेष.




उघड्यावर शौचास गेल्यामुळे गावांत रोगराई पसरते. हे टाळण्यासाठी मागील काही वर्षात 'घर तिथे शौचालय' उभारण्यात आले. यासाठी प्रति शौचालय बारा हजार रुपये अनुदान देण्यात आले. आज कितीही छोट्या गावात गेल्यानंतर घरासमोर वा घरात स्वच्छतागृह दिसते. या स्वच्छतागृहांचा नियमित वापर व्हावा, यासाठी जनजागृती करण्यात आली. यानंतरही जे लोक नियमित वापर करणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध गुड मॉर्निंग पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत असे. कोरोनापर्यंत ही पथके ॲक्टिव्ह होती. मात्र, कोरोनाच्या लाटेनंतर ही पथके थंड झाली. त्यामुळे स्वच्छतागृह वापराचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे.गावखेड्यातील अनेक स्वच्छतागृहांत लाकूड अन् गोवऱ्या आढळून येतात. तर काही लोक बाथरूम म्हणून या स्वच्छतागृहांचा वापर करताहेत. परिणामी, गावात जाताना लोकांना नाकासमोर रुमाल धरण्याशिवाय गत्यंतर नाही.गावखेड्यांत उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे खासकरून पावसाळ्यात ग्रामस्थांना साथीच्या आजारांचा सामना करावा लागतो. याबाबत सीईओ समीर कुर्तकोटी यांनी संबंधित विभागाला आदेशित करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**गुड मॉर्निंग पथकांत कोण कोण?**

स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून जिल्हा, तालुकास्तरावर गुड मॉर्निंग पथके स्थापण्यात आली होती. ज्यात गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, पोलिस पाटील आदींचा समावेश असतो.

**शौचालयात लाकूड अन् गोवऱ्याही...**

अनेक कुटुंबांनी शौचालये घराच्या समोरच बांधली आहेत. या शौचालयांचा फारसा वापर होताना दिसत नाही. काहींकडून या स्वच्छतागृहांचा वापर चुलीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या, लाकूड ठेवण्यासाठी केला जात आहे.

**सीईओंनी लक्ष देण्याची गरज**

साधारणपणे २०२१ पासून जिल्ह्यात गुड मॉर्निंग पथके सक्रिय नाहीत, त्यामुळे शौचालय वापराचे प्रमाण झपाट्याने खाली येत आहे. अशा लोकांना आळा बसावा, यासाठी आता गुड मॉर्निंग पथके पुन्हा 'ॲक्टिव्ह करण्याची गरज आहे.

# वकील क्षेत्र हे अखंड शिक्षण प्रवाह आहे : ज्येष्ठ वकील किशोर देशपांडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

माणूस हा आपल्या अवती भोवती च्या अनुभवातून सदैव नव नवीन बाबी शिकत असतो हे अनुभवाचे शिक्षण अत्यंत महत्वाचे असते वकील क्षेत्र ही याला अपवाद नाही.प्रत्येक न्यायालयीन खटला हा वकीलांचे अनुभव विश्व संपन्न करीत असतो. वकील क्षेत्र हे अखंड शिक्षणाचा सदोदीत वाहणारा प्रवाह आहे. या प्रवाहात वकीलांनी आपले काम करतांना नव्या बदलांच्या प्रक्रीयेत समर्पित होवून आपले कार्य करावे.असे प्रतिपादन जेष्ट वकील किशोर देशपांडे यांनी आज केले .



अमरावती वकील संघ आयोजित रोझेस इन डिसेंबर या व्याख्यान मालेत पहिले पुष्प गुंफतांना ते बोलत होते.प्रशिध्द हायकोर्ट जस्टीस एम.सी.छागला यांचे रोझेस इन डिसेंबर हे एक आत्मचरीत्र पुस्तक आहे .यात जस्टिस्ट छागला यांनी न्यायदान क्षेत्रातील आपले अनुभव दीर्घ लेखनातून कथन केले आहेत.

जस्टिस्ट छागला नंतर राजकीय सल्ला क्षेत्रात ही वावरले सलग चार केंद्रीय मंत्रीमंडळाचा त्यांनी अनुभव घेतला. जस्टीस्ट एम.सी.छागला यांच्या या पुस्तकाचा धागा पकडून अमरावती वकील संघाने रोझेस इन डिसेंबर या तीन दिवशीय व्याख्यान मालेचे आयोजन केले आहे . या व्याख्यान मालेचे प्रथम पुष्प गुंफतांना जेष्ट वकील किशोर देशपांडे बोलत होते.

किशोर देशपांडे यांनी आपल्या वकील व्यवसायातील रोचक उद्बोधक आठवनी सांगत व्याख्यान गुंफन केली .३१ ऑक्टोंबर १९८४ साली माझा कोर्टाचा पहिला दिवस होता याच दिवशी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निधनाची दुःखद बातमी आली होती.

लोक विवाद करतात लोकांच्या या विवादावरच वकील पोलीस जेल यांच अस्तित्व टिकून आहे. पण हे सर्व योग्य वाटत नाही. अनेक विवाद आपशी सहमती तडजोडीने मिटवता येवू शकतात तरी सुध्दा समाजात लोक भांडतात न्यायालयात पोहचतात .

आपल्या कडे न्यायालयीन कामकाज मराठी भाषेतून चालावे यासाठी आग्रह आहे. परंतु जो पर्यंत सर्वच न्यायालयाचे निकाल हे मराठी भाषेतून येत नाहीत तो पर्यंत मराठी कामकाजा ला कसलाही अर्थ येवू शकत नाही.

तांत्रीक भाषांतर करतांना बरेच वेळा अर्थाचा अनर्थ होत असतो. यात तंत्रज्ञान मर्यादा येत असतात शेवटी भाषांतर काराला हे सर्व बघावे लागते. म्हणून भाषा व बोलीभाषा हे ज्ञान वकीलांनी प्रथम आत्मसात केले पाहिजे. आपला भाषा शब्दकोष संग्रह वाढवला पाहिजे.शासन व्यवहार कोष अध्ययन केला पाहिजे. वकील क्षेत्र हे अखंड शिक्षणाचा प्रवाह आहे. आज वकील क्षेत्रात अनेक नव नवे बदल होत आहेत. हे सर्व बदल स्विकार करीत शिक्षणाच्या या अखंड प्रवाहात वकीलांनी स्वत:ला सृजनशिल बनविल पाहिजे.

अमरावती वकील संघाचे अध्यक्ष अँड.विश्वास काळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की वकील हा आपल्या पक्षकारा साठी नेहमी प्रामाणिक असला तर यातून त्याची व्यवसायीक वृध्दी व्हायला मदत होते. व्याख्यान मालेच्या प्रारंभी जेष्ट वकील किशोर देशपांडे यांच्या वकील संघाच्या वतीने शाल व रोपटे देवून सत्कार करण्यात आला . संपूर्ण कार्यक्रमाचे अँड. सोनाली तायडे यांनी मंत्रमुग्ध सूत्रसंचालन केले. वकील संघाचे उपाध्यक्ष अँड.एन.डी.राऊत यांनी आपल्या प्रास्ताविकात सदर व्याख्यानाची गरज विषद केली. जेष्ट वकीलांचे अनुभव नव्या पिढीतील वकीलांना ज्ञात व्हावेत नवी जुनी ही शृंखला तयार व्हावी हा या व्याख्यान माला आयोजनाचा मुख्य हेतू आहे.

# जीवनाच्या उंबरठ्यावर कार्यशाळेचे आयोजन

## मनपाच्या महिला व बालविकास विभागाचा उपक्रम



**दि.२०अमरावती**

अमरावती महानगरपालिका अमरावती महिला व बालविकास विभाग द्वारा गेल्या चार वर्षापासून जीवनाच्या उंबरठ्यावर एक दिवसीय कार्यशाळा हा विशेष कार्यक्रम विविध विद्यालय व महाविद्यालय येथे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे आजच्या युवा पिढीतील युवा वर्ग किंवा महिलांच्या वैचारिक शारीरिक व मानसिक जीवनाच्या संबंधित त्यांना चांगल्या वाईट गोष्टीची तसेच समाजामधील घडत असलेल्या महिला अत्याचाराविषयी जसे की विनयभंग छेडखानी त्यासोबत त्यांच्यामध्ये किशोरवयीन वयामध्ये शारीरिक बदल वयामधील समजूतदारपणा अशी माहिती तज्ञ डॉक्टर,सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ञ व समूह संघटक यांच्याद्वारे जीवनाच्या उंबरठ्यावर ही संकल्पना ठेवून दरवर्षी २० महाविद्यालय राबवुन मार्गदर्शन करण्यात येत आहे. या जीवनाच्या उंबरठ्यावर जीवनातील प्रवास कसा असावा किंवा आपले पाऊल कसे टाकावे या संदर्भात घरापासून ते शाळेपर्यंतची तसेच समाजात आपली वागणूक,आपल्यापेक्षा मोठ्या लोकांशी व्यवहार,अभ्यासाचा ताण तणाव कमी करून प्रगती कशी साधावी याचे मार्गदर्शन व समुपदेशन च्या माध्यमातून सोडविण्यात आले आहे या कार्यक्रमाचे सर्वस्वी श्रेय ज्यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील एकमेव महानगरपालिका जीवनाच्या उंबरठ्यावर या कार्यक्रमाचे मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या आदेशानुसार नियोजन मा. उपायुक्त नरेंद्र वानखडे महानगरपालिका अमरावती यांनी केले असून यामध्ये कोणते विषय कसे घ्यावेत याविषयी तज्ञ व्यक्ती सांगून सूचना देतात. या मुळे कार्यक्रमाला गवसनी घेत असताना आजपर्यंत १९९३० किशोरवयीन मुलीपर्यंत कार्यक्रम पोहचला असून उद्दिष्ट साध्य केले आहे.तसेच ४००० मुलींपर्यंत या वर्षामध्ये पोहोचायचे नियोजन आहे. आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मा. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांचे प्रयत्न असून शिक्षणाधिकारी तथा महिला व बालविकास अधिकारी (प्रभारी) डॉ.प्रकाश मेश्राम हे सुद्धा मार्गदर्शन करीत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता समन्वयक दिगंबर तायडे, प्रियंका रघुवंशी, अमोल साकुरे परिश्रम घेत आहेत.आतापर्यंत या महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न झालेले आहेत.

आतापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय फ्रेजरपुरा अमरावती,महामना मालवीय विद्यालय तपोवन अमरावती व गोल्डन किड्स विद्यालय कॅम्प अमरावती या महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न झालेले आहेत.

# विद्यापीठात २३ व २४ डिसेंबर रोजी संशोधन महोत्सव

## विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत शेकडो विद्यार्थी सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये येत्या २३ व २४ डिसेंबर रोजी विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धा होणार असून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागावी या दृष्टीने हा दोन दिवसीय संशोधन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.



स्पर्धेचे उद्घाटन २३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. भौतिकशास्त्र विभागातील सेमिनार हॉलमध्ये होणार असून समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते हे भूषविणार आहेत. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सिध्दार्थविनायक काणे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेचा समारोप २४ डिसेंबर रोजी दुपारी ३.०० वा. विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृह (ए.व्ही. थिएटर) येथे होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित राहणार आहेत.

आविष्कार स्पर्धेत विद्याथ्र्यांनी मोठए संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य संचालक डॉ. अजय लाड, अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, स्पर्धेचे सचिव डॉ. गजानन मुळे यांनी केले आहे.

# दुकानात रेशन आलं, तर मेसेज येणार तुम्ही मोबाइल नंबर अपडेट केला का?

## गैरव्यवहाराला बसतेय चाप: शिधापत्रिकेसोबत मोबाइल क्रमांक सीडिंग करणे गरजेचे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

रेशन दुकानात तुमचे रेशन आले असेल, तर त्याचा मेसेज मिळेल. एवढेच नाही तर रेशन उचलल्यानंतरही मेसेज मिळेल. आपल्या हक्काचे रेशन दुसऱ्या कुण्या व्यक्तीने उचलल्यास त्याचाही मेसेज आपल्या मोबाइलवर येणार आहे. त्यासाठी शिधापत्रिकेशी आधारकार्ड जोडणी, मोबाइल क्रमांक जोडणी करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांना मोफत धान्याचे वितरण केले जाते. ई-पॉस मशिनद्वारे रेशन कार्डधारकाच्या अंगठ्याचा ठसा घेऊन धान्य पुरविले जात असले, तरी तांत्रिक अडचणी आल्यास ओटीपीचा वापर करून धान्याची उचल करता येते. परंतु, संबंधित लाभार्थ्यांचा मोबाइल क्रमांक शिधापत्रिकेशी संलग्न असणे आवश्यक आहे. धान्याचे वितरण करताना स्वस्त धान्य दुकानदारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे धान्य दुकानदारांसंदर्भात ग्राहकांकडून अनेक तक्रारीसुद्धा प्राप्त होतात. त्यामुळे याप्रकारांना आळा बसावा आणि सुरळीत धान्य वितरण व्हावे, म्हणून पॉस मशिनद्वारे धान्याचे वितरण सुरू करण्यात आले आहे. आधारकार्ड जोडणी, मोबाइल क्रमांक जोडणी आदी प्रक्रिया करावी लागते. या प्रक्रियेमुळे रेशन उचलल्यानंतर मोबाइलवर संदेश येतो.

**धान्य घेतले, तरीही येणार एसएमएस**

एखाद्या कार्डधारकाने स्वस्त धान्याचा लाभ घेण्याकरिता मोबाइल ओटीपी सेवेचा लाभ घेतल्यास त्याच्या मोबाइलवर धान्याची उचल केल्याचा संदेश येतो. त्यामुळे त्याला धान्याच्या उचलबद्दल सर्व माहिती प्राप्त होते. त्यामुळे आधार कार्ड तसेच मोबाईल नंबर लिंक करणे गरजेचे आहे.


# तालुका विज्ञान प्रदर्शनीमध्ये नांदगाव पेठच्या जि.प. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने पटकाविला प्रथम क्रमांक

## ज्ञान, विज्ञान परीक्षेत सुद्धा मारली बाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० नांदगाव पेठ**

यावली शहीद येथे झालेल्या ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये नांदगाव पेठ येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.'माझी नैसर्गिक शेती' हा या प्रदर्शनीमधील विज्ञान मॉडेलचा विषय होता. तालुक्यातील अनेक नामवंत शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता यामधून नांदगाव पेठच्या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला.याशिवाय ज्ञान विज्ञान परिक्षेमध्ये सुद्धा या शाळेने प्रथम पारितोषिक मिळविले असून विद्यार्थी व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

समाजातील अद्यावत समस्यांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित व्हावे त्यावर विज्ञानाव्दारे तोडगा निघावा आणि विज्ञानाचा उपयोग वसुंधरेच्या कल्याणासाठी होण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठा, चिकित्सक दृष्टी, समस्या निराकरण, निर्णयक्षमता इ. गुणांचा विकास व्हावा व वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण होऊन अंधश्रध्दा निर्मुलन व्हावे या उद्देशाने शिक्षण विभाग पंचायत समिती अमरावती,मुख्याध्यापक संघ अमरावती व विज्ञान अध्यापक मंडळ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद स्मारक माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, यावली शहीद येथे दि. १८ व १९ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनीमध्ये तालुक्यातील अनेक नामवंत शाळांमधील बाल वैज्ञानिकांनी प्रतिकृती सादर केल्या होत्या.यामध्ये जि.प.माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता दहावीतील विद्यार्थी कु.तनुजा प्रदीप इंगोले व कौस्तुभ सुनील धर्माळे यांनी सादर केलेल्या प्रतिकृतीने सर्वांचे लक्ष वेधले.





डॉ. कु. जयश्री इंगळे या शिक्षिकेच्या मार्गदर्शनात तनुजा आणि कौस्तुभ यांनी विज्ञान प्रदर्शनीमध्ये सादरीकरण केलेल्या प्रतिकृतीला निवड समितीने प्रथम क्रमांक देऊन जि. प. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव पेठ या शाळेने तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला.दरवर्षी शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या जि.प. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने आजवर अनेक उपक्रमांमध्ये विभागस्तरावर आपली मोलाची भूमिका बजावली असून अनेक विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर सहभागी होण्याची संधी मिळाली शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी संधीचे सोने करत शाळेचा नावलौकिक वाढविला.विद्यार्थी व शिक्षकांनी मिळविलेल्या या यशाबद्दल डॉ.अरविंद मोहरे (शिक्षणाधिकारी प्राथमिक), धनंजय वानखडे (गटशिक्षणाधिकारी अमरावती) शाळेचे प्राचार्य देवेंद्र ठाकरे, सर्व शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले.